ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक २१० वा ❑ भारतीय सौर दिनांक १८ आश्विन शके १९४८, रविवार दि.११ ऑक्टोबर २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य:निशुल्क (खासगी वितरणासाठी)

विशेष लेख...

परराज्यातील आलिशान वाहनांवर परिवहन विभागाची विशेष धडक मोहीम

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

महाराष्ट्रातील रस्त्यांवर, विशेषतः मुंबई, पुणे, ठाणे आणि नागपूर यांसारख्या प्रमुख आणि गजबजलेल्या शहरांमध्ये गेल्या काही वर्षांत परराज्यातील नोंदणी असलेल्या महागड्या आणि आलिशान गाड्यांची संख्या अतिशय वेगाने वाढताना दिसत आहे. राज्याच्या परिवहन विभागाला आणि प्रशासनाला मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, सध्या केवळ महाराष्ट्र राज्यात ५६०० हून अधिक अशा आलिशान गाड्या आहेत, ज्यांची बाजारातील किंमत ५० लाख रुपयांपेक्षा जास्त आहे. महाराष्ट्र राज्याचा मोटार वाहन कर इतर काही राज्यांच्या आणि विशेषतः केंद्रशासित प्रदेशांच्या तुलनेत थोडा जास्त असल्याने, केवळ हा कर वाचवण्याच्या दुटप्पी हेतूने अनेक बडे उद्योगपती, व्यावसायिक आणि समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती आपल्या अति-महागड्या गाड्यांची नोंदणी दादरा आणि नगर हवेली, दमण आणि दीव किंवा तत्सम अतिशय कमी कर असलेल्या राज्यांमध्ये करतात. या राज्यांमध्ये कर कमी असल्याने गाडीच्या एकूण किमतीत लाखो रुपयांची बचत होते. मात्र, कागदोपत्री परराज्यात नोंदणीकृत असलेल्या या गाड्या प्रत्यक्षपणे दररोज महाराष्ट्रातच वापरल्या जातात. राज्याच्या पायाभूत सुविधांचा आणि येथील गुळगुळीत रस्त्यांचा पुरेपूर वापर करणाऱ्या या गाड्या स्थानिक कर मात्र भरत नाहीत, ही अत्यंत गंभीर बाब समोर आली आहे.

या वाढत्या कर चुकवेगिरीमुळे राज्याच्या तिजोरीचे दरवर्षी शेकडो कोटी रुपयांचे अतोनात नुकसान होत आहे. सर्वसामान्य नागरिक जेव्हा एखादी छोटी गाडी घेतो, तेव्हा तो प्रामाणिकपणे राज्याचा सर्व कर भरतो. मात्र, करोडो रुपयांच्या गाड्या घेणारे धनाढ्य लोक पळवाटा शोधून कर चुकवतात, हा राज्याच्या विकासावर आणि प्रामाणिक करदात्यांवर मोठा अन्याय आहे. या संपूर्ण प्रकरणाला एक भक्कम कायदेशीर किनार आहे, कारण मोटार वाहन कायद्यातील नियम या संदर्भात अत्यंत स्पष्ट आणि कठोर आहेत. या कायद्यानुसार, कोणतीही परराज्यातील नोंदणीकृत गाडी जर महाराष्ट्रात सलग १२ महिन्यांपेक्षा अधिक काळ वापरली जात असेल, तर त्या गाडीची रीतसर नोंदणी महाराष्ट्रात नव्याने करणे आणि राज्याच्या नियमांनुसार येथील मोटार वाहन कर भरणे कायदेशीररित्या बंधनकारक असते. असे अगदी स्पष्ट नियम असतानाही, अनेक गाड्या वर्षानुवर्षे याच राज्यात फिरत असूनही त्यांचा कर आजवर भरला गेलेला नाही. या जाणीवपूर्वक आणि सर्रास होत असलेल्या उल्लंघनाला कायमचे आळा घालण्यासाठी तसेच राज्याचा बुडित महसूल वसूल करण्यासाठी परिवहन विभागाने ५ ऑक्टोबर ते १७ ऑक्टोबर या १२ दिवसांच्या कालावधीत एक राज्यव्यापी विशेष तपासणी मोहीम हाती घेण्याचा अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

५ ऑक्टोबर रोजी सुरू होणाऱ्या आणि १७ ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या या विशेष धडक मोहिमेअंतर्गत कारवाईची दिशा अत्यंत सविस्तर, नियोजनबद्ध आणि कठोर असणार आहे. या कारवाईसाठी राज्यभरात परिवहन विभागाची विशेष भरारी पथके तैनात करण्यात आली आहेत. मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर, नाशिक यांसारख्या मोठ्या शहरांमध्ये, शहरांच्या प्रवेशद्वारांवर आणि महत्त्वाच्या महामार्गांवर विशेष नाकाबंदी केली जाणार आहे. परराज्यातील नोंदणी क्रमांक असलेल्या सर्व महागड्या गाड्या अडवून त्यांची केवळ वरवरची नव्हे, तर अतिशय कसून चौकशी केली जाईल. गाडीचे पथकर नाक्यांवरील मागील अनेक महिन्यांचे तपशील, अधिकृत दुरुस्ती केंद्रांमधील गाडीच्या सर्व्हिसिंगच्या तारखा आणि नोंदी, इंधन भरल्याच्या पावत्या, शहरातील विविध निगराणी कॅमेऱ्यांचे चित्रण आणि गाडी मालकाचे प्रत्यक्ष रहिवासी पुरावे अत्यंत बारकाईने तपासून ती गाडी महाराष्ट्रात नेमकी किती काळापासून आहे, हे सप्रमाण सिद्ध केले जाणार आहे.

अशा सखोल चौकशीत एखादी गाडी १२ महिन्यांपेक्षा जास्त काळ राज्यात असल्याचे सिद्ध झाल्यास, त्या मालकाकडून राज्याचा संपूर्ण थकीत मोटार वाहन कर जागेवरच वसूल केला जाईलच, शिवाय कायदेशीर नियमांचे वारंवार उल्लंघन केल्याबद्दल त्यावर मोठा आर्थिक दंडही आकारला जाईल.

एवढेच नव्हे तर, कर भरण्यास टाळाटाळ करणाऱ्या, अधिकाऱ्यांशी हुज्जत घालणाऱ्या किंवा प्रशासनाला तपासात सहकार्य न करणाऱ्या मुजोर वाहनमालकांच्या गाड्या थेट जप्त करण्याचे सर्वाधिकार परिवहन अधिकाऱ्यांना या मोहिमेअंतर्गत बहाल करण्यात आले आहेत. राज्यातील रस्ते, उड्डाणपूल आणि अन्य पायाभूत सुविधांच्या विकासासाठी मोटार वाहन करातून मिळणारा महसूल हा अत्यंत कळीचा आणि महत्त्वाचा मुद्दा असतो.

५ ते १७ ऑक्टोबर दरम्यान चालणाऱ्या या मोहिमेतून राज्य प्रशासनाला एक अत्यंत स्पष्ट आणि कडक संदेश द्यायचा आहे की, कायद्यापेक्षा कोणीही मोठा नाही आणि धनाढ्य वर्गाकडून होणारी ही कर चुकवेगिरी यापुढे अजिबात खपवून घेतली जाणार नाही. या कठोर तपासणी सत्रातून राज्याच्या तिजोरीत नक्कीच कोट्यवधी रुपयांची भर पडण्याची दाट शक्यता असून, कर चुकवणाऱ्या वाहनमालकांचे धाबे मात्र आता चांगलेच दणाणले आहेत.

बी एच सिरीज नंबर असेल, तर दुसऱ्या राज्यात गेल्यानंतर गाडीचा नंबर बदलण्याची किंवा पुन्हा तिथे रोड टॅक्स भरण्याची कोणतीही गरज नसते. तो संपूर्ण भारतात कायमस्वरूपी वैध राहतो.

चिंतन आणि अभ्यासाचा आधार असल्यास चित्रपट विषयक साहित्य टिकेल

पुणे पुस्तक जत्रेतील परिसंवादात मान्यवरांचे मत

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

पुणे – केवळ मनोरंजनासाठी उथळपणे चित्रपटविषयक साहित्य लिहिले गेल्यास ते तात्कालीक ठरेल, चिंतन करूनच या कलेविषयी लिहिले जावे आणि तरच ते काळाच्या कसोटीवर टिकेल, असा सूर चित्रपट विषयक साहित्य टिकाऊ आहे का? या परिसंवादात उमटला.

पुणे बुक फेअरमध्ये झालेल्या या परिसंवादात कृपाशंकर शर्मा, प्रभाकर खोले, स्वप्निल पोरे, श्रीपाद ब्रह्मे, मुकुंद फडके आणि धनंजय कुलकर्णी यांनी सहभाग घेतला.

चित्रपट माध्यमाच्या शक्तीची जाण ठेऊन, त्या बरोबरीने समाजीक व सांस्कृतिक भान राखून केलेले चित्रपटविषयक लेखन येणाऱ्या काळात निश्चितपणे टिकून राहील, असे मत कृपाशंकर शर्मा यांनी व्यक्त केले.



पाश्चात्य देशात ज्या पद्धतीने चित्रपट माध्यमावर दर्जेदार पुस्तके निघतात तशी भारतात निघत नाही हे कटू सत्य आहे, असे मत प्रभाकर खोले यांनी व्यक्त केले. ते म्हणाले, आपल्याकडील अनेक कलावंतांनी आत्मचरित्र लिहिलीच नाहीत, त्यामुळे त्या काळाचा त्या कलावंताशी असलेला कनेक्ट आपण गमावून बसलो !

त्या-त्या पिढीतील लेखकांनी चित्रपट माध्यमांशी संबंधित कलाकारांना बोलते करुन त्यांच्या आठवणी समाजासमोर आणल्या पाहिजेत असे मत स्वप्निल पोरे यांनी व्यक्त केले. यातून संदर्भमूल्य असलेले साहित्य निर्माण होईल, असे ते म्हणाले.

श्रीपाद ब्रह्मे म्हणाले, चित्रपट विषयक लिखाणात पुरेसे गांभीर्य असावे. चिंतनाची बैठक असलेले चित्रपटविषयक साहित्य दीर्घकाळ टिकून राहील.

मुकुंद फडके म्हणाले, चित्रपट समीक्षा किंवा परीक्षण हे विषय त्या काळापुरते असतात. पण कलाकारांची चरित्रे, आत्मचरित्र,विशेष मुलाखती यांना मात्र टिकाऊपणा असतो. कारण त्यांच्याकडे संदर्भमूल्यही असते. आधुनिक काळात डिजिटल माध्यमांचा वापर करून चित्रपट विषयक साहित्य टिकवायला हवे.

बदलत्या काळानुसार माध्यम देखील बदलत आहेत, याकडे धनंजय कुलकर्णी यांनी लक्ष वेधले. ते म्हणाले, डिजिटल आणि सोशल मीडिया आता महत्त्वाचा ठरत असून लेखकांनी नव्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेतले पाहिजे.

प्रारंभीज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. पुणे बुक फेअरचे संयोजक पीएनआर राजन यांच्या हस्ते वक्त्यांचा सत्कार झाला. समन्वयक शिरीष चिटणीस यांनी आभार मानले. परिसंवादाचे सूत्र संचालन स्वप्नील पोरे यांनी केले.

'महानुभाव पंथ : एक प्रगतशील विचारधारा' या वैचारिक ग्रंथाचे प्रकाशन

"पुस्तक हे पिढ्यानपिढ्या मानवाला व समाजाला योग्य आणि प्रगतशील दिशा दाखवणारा एक महान वैचारिक वारसा आहे."


ज्योतिर्मय 🕮 साहित्य

महानुभाव पंथाची मानवतावादी, समतावादी आणि विवेकनिष्ठ विचारधारा समाजासमोर मांडणाऱ्या 'महानुभाव पंथ : एक प्रगतशील विचारधारा' या पुस्तकाचे प्रकाशन अक्षरशिल्प प्रकाशनचे संचालक मा. विकास राऊत यांच्या हस्तकौशल्याने व मार्गदर्शनाखाली पार पडले. अमरावती येथील लेखिका सौ. योगिता प्रकाश निपाणे यांनी या ग्रंथाचे लेखन केले असून, हे त्यांचे पहिलेच निर्मितीपुष्प आहे.

पुस्तकाची पार्श्वभूमी व स्वरूप:

महानुभाव पंथाच्या अथांग आणि समृद्ध साहित्याचा सखोल अभ्यास करून लेखिकेने हा ग्रंथ सिद्ध केला आहे. पंथाकडे केवळ पारंपरिक श्रद्धेच्या दृष्टीने न पाहता; त्यातील तर्कशुद्ध, समाजाभिमुख आणि प्रगतशील पैलू उलगडून दाखवणे हा या पुस्तकाचा मुख्य उद्देश आहे.

सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींनी तत्कालीन समाजात स्त्री-पुरुष समानता, जातीभेद-निर्मूलन आणि सामाजिक समतेचा जो विचार मांडला, तो विचार महानुभाव पंथाच्या मूळ साहित्यात कसा अंतर्भूत आहे, याचे अभ्यासपूर्ण आणि समीक्षणात्मक विश्लेषण या पुस्तकात करण्यात आले आहे. समाजात पसरलेले गैरसमज दूर करून निकोप विचारसरणी रुजवण्यासाठी हा ग्रंथ महत्त्वाचा दुवा ठरेल.



'बाळाच्या जन्माइतकाच भावुक क्षण' लेखिकेचे मनोगत

आपल्या पहिल्या पुस्तकाविषयी भावना व्यक्त करताना लेखिका सौ. योगिता निपाणे म्हणाल्या, ''पुस्तकाची पहिली प्रत हातात घेतानाचा तो क्षण अत्यंत भावुक आणि शब्दातीत असा होता. जशी एखादी आई आपल्या नवजात बाळाला पहिल्यांदा स्पर्शिते, तसाच काहीसा उत्कट आनंद मला माझे हे पहिले पुस्तक हातात घेताना झाला. महानुभाव पंथाचे साहित्य आणि त्याचे गाढे अभ्यासक यांची परंपरा मोठी आहे. त्यामुळे सत्य आणि सप्रमाण विचार वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी मोठा कस लागला. विषयाची सुरुवात करणे जितके सोपे असते, तितकाच तो विचार शेवटपर्यंत समर्थपणे नेणे ही लेखकासाठी मोठी कसरत असते.''

योगिता निपाणे

अभ्यासक आणि विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ग्रंथ:

हा ग्रंथ केवळ सामान्य वाचकांसाठीच नव्हे, तर शालेय, माध्यमिक व महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी तसेच संशोधकांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. आजच्या काळात ही प्रगतशील विचारधारा अभ्यासणे ही काळाची गरज बनली आहे.

ग्रंथाविषयी संक्षिप्त माहिती:

* ग्रंथनाव: महानुभाव पंथ : एक प्रगतशील विचारधारा
* लेखिका: सौ. योगिता प्रकाश निपाणे (अमरावती)
* प्रकाशक: अक्षरशिल्प प्रकाशन (मा. विकास राऊत)
* मूळ किंमत: ₹ २५०/- (विशेष सवलत मूल्य: ₹ २००/-)
* संपर्क / नोंदणीसाठी: ९८५०५३७१४२

***

घटस्थापना : नवरात्र प्रारंभ

ज्योतिर्मय 🕮 साहित्य



भारताला सण, उत्सव व धार्मिक विधींची खुप जुनी परंपरा लाभलेली आहे. देशाच्या संस्कृती व रूढी,परंपरे प्रमाणे जे सण, उत्सव पूर्वापार चालत आलेले आहेत ते आजही मोठ्या उत्साह आणि आनंदाने साजरे केले जातात. देशाच्या या सण, उत्सवामुळे भारतीय संस्कृती, परंपरा, नैतिक व धार्मिक मूल्ये जपल्या जातात व समाजात एकता, बंधुता, समानता राखल्या जात आहे. अशाच उत्सवात नवरात्र व तदनंतर विजया दशमी (दसरा) ची पूर्व कल्पना देणारा व देवींची शक्ती उपासना दर्शविणारा ''घटस्थापना'', हा उत्सव होय. देशातील घराघरात घटस्थापना होते व नऊ दिवस देवींची उपासना होऊन महिला वर्ग आत्मबल, आत्मशक्ती प्राप्त होओ व या भूतलावरील दृष्टवृत्ती नष्ट होवोत म्हणून देवी मातेची मनोभावे आराधना करतात.



धोंडीरामसिंह ध. राजपूत
वैजापूर, छत्रपती संभाजीनगर
मो. ९४२१३१२२४४

घरातील देव्हाऱ्यात देवी मूर्ती किंवा देवी प्रतिमा ठेऊन त्यासमोर मातीच्या भांड्यात (मातीचे गाडगे) घटाची स्थापना केली जाते. घटाच्या बाजूला शेतातील थोडी माती पसरऊन त्यात गव्हाच्या किंवा ईतर धान्यच्या बिया पेरल्या जातात. या घटाला नागीनच्या पानांची पताका बांधली जाते, दररोज वेगवेगळ्या वनस्पतीच्या पानांच्या पताका नऊ दिवस बांधल्या जातात व दररोज देवीची आरती गाऊन पूजा केली जाते. दहाव्या दिवशी होमहवन, करून पूजा केली जाते, देवी मातेला नैवेद्य दिला जातो, घटाच्या बाजूला मातीत उगवलेल्या बियातून अंकुरकेल्या कोवळ्या रोपट्यांना डोक्यावरील टोपीत खोवून गावातील देवी मातेचे दर्शन साठी जातात, देवीचे दर्शन घेऊन सोने लुटले जाते. (सोने म्हणजे आपट्याची पाने). घरी आल्यावर सुहासिनी औक्षण करतात. आपट्याची पाने घरातील घट व देवीला अर्पण करून ही पाने स्नेही, आप्तेष्ट व मित्र परिवारातील सदस्यांना देऊन दसरा शुभेच्छा दिल्या जातात. सर्वांना घटस्थापनेच्या शुभेच्छा.





जात्यावरच्या ओव्या.....

माय माऊलीची माया
हरणी संग पाडस
शिकारी गेले परतून
दुध पित होत गोंडस ||८८५||

माय माऊलीची माया
विचारा गायी वासरा
गोकुळात बाळाची
माऊली यशोधरा ||८८६||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ७८



ज्योतिर्मय साहित्य

समर्थ म्हणतात, मनी मानवा व्यर्थ चिंता वाहते, अकस्मात होणार होऊन जाते. प्रारब्धानुसार जे घडायचे असते, ते घडणारच असते. आपण मात्र व्यर्थ चिंता करीत बसतो. त्यापेक्षा आपण त्याच्यावर विश्वास ठेवून सर्व भार त्याच्यावर सोपवावा. याचा अर्थ मात्र असा नाही की आपल्या वाट्याला आलेले कर्म न करता स्वस्थ बसायचे. अर्जुनाला कर्तव्यप्रवण करण्यासाठीच तर भगवंताने गीता सांगितली ना !तेव्हा त्याच्यावर विश्वास ठेवून आपल्या वाट्याला आलेले निहित कर्म उत्तम प्रकारे करावे. तोच पुरुषार्थ आहे. इतर गोष्टी परमेश्वरावर सोपवाव्यात. तुकाराम महाराज म्हणतात, ''घालू देवासीच भार, देव सुखाचा सागर.''मग देहाच्या आणि प्रपंच्याच्या चिंता आपल्याला सतावणार नाहीत.



स्वसंवाद :

१. ''माझे कसे होईल? माझ्या कुटुंबियांचे कसे होईल?'' या विचारसरणीत अडकून मी समर्थांनी म्हटल्याप्रमाणे प्रपंचाची वृथा (व्यर्थ) चिंता करत बसलो आहे का?


२. संकटाच्या काळात मी एका पामरासारखा विचलित होऊन खचून जातो, की भगवंतावर संपूर्ण भार टाकून खंबीरपणे परिस्थितीचा सामना करतो?


३. कल्पवृक्षाप्रमाणे असणाऱ्या श्रीरामाच्या चरणी आल्यावर मी त्याच्याकडे केवळ तात्पुरती ऐहिक सुखे मागतो आहे, की चिरंतन शांती आणि मोक्षाची आस धरतो आहे?

४. तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे, ''देव सुखाचा सागर'' आहे यावर माझा पूर्ण विश्वास आहे का? मी माझे निहित कर्म करून उरलेला भार त्याच्यावर सोपवायला शिकलो आहे का?

(क्रमशः)







श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

नामाचे प्रेम नामाच्या सहवासाने येईल

ज्योतिर्मय साहित्य

नामाचे प्रेम येण्यासाठी आपल्या प्रेमळ आईकडेच बघा. मुलाला जरा ताप आला तरी आईच्या पोटात धस्स होते, अन्न गोड लागत नाही, झोप लागत नाही, अशा अनेक गोष्टी होतात. थोडक्यात म्हणजे, तिला सर्व बाजूंनी अस्वस्थता उत्पन्न होते. नाम घेण्यात थोडा व्यत्यय आला तर आपली स्थिती तशी होते का ? याचे उत्तर आपल्याला स्वत:कडूनच मिळण्यासारखे आहे. नाम घेणे हा माझा धर्म आहे, ते माझे आद्य कर्तव्य आहे, त्याच्याशिवाय जगणे म्हणजे मेल्यासारखेच आहे, नाम घेण्यात माझे आत्यंतिक हित आहे, किंबहुना मी नामाकरिताच जन्माला आलो आणि तद्रूपच होऊन जाईन, इतक्या प्रज्वलित भावनेने नाम घेणे जरूर आहे; आणि मग प्रेम आले नाही ही गोष्ट शक्यच नाही. प्रेम येत नाही याचा अर्थच हा की, आम्ही नाम खऱ्या आस्थेने घेत नाही. ह्या सर्वांवर उपाय म्हणजे नाम घेण्याच्या निश्चयाने, ते जसे येईल तसे घेत राहणे. तेच नाम आपल्याला एक एक पाऊल पुढे नेऊन ध्येय गाठून देईल. ' परिस्थिती चांगली आली म्हणजे नाम घेईन ' असे म्हणणारा मनुष्य नाम कधीच घेत नाही.

नाम हे मनात किंवा उच्चार करूनही घेता येते. नामात राहावे, म्हणजे अंत:करणाची शुद्धता होईल, आणि अंत:करण शुद्ध झाले की भगवंताचे प्रेम येईल. नुसत्या पुष्कळ जपापेक्षा, विवेकाने आणि विचाराने आलेले प्रेम नामात असणे जरूर आहे. खरे म्हटले म्हणजे नामातच नामाचे प्रेम आहे. ताकात लोणी असतेच, फक्त ते वर दिसत नाही; पण ताक घुसळल्यावर जसे ते वर येते, तसे भगवंताचे नाम आपण घेतले की त्याचे प्रेम आपोआप वर येते. साध्या शब्दांचादेखील आपल्या वृत्तीवर परिणाम होऊन, तो तो भाव आपल्या मनात जागृत होतो, मग भगवंताच्या नामाने भगवंताचे प्रेम का येणार नाही ? आज तुम्हाला जेवढा वेळ रिकामा मिळतो, तेवढा सगळा भगवंताच्या नामात घालवण्याचा प्रयत्न करा.

पुष्कळ दिवस एका घरात राहिल्याने त्या घराविषयी आपल्याला प्रेम येते ना ? प्रपंचाचे प्रेम आपल्याला सहवासाने आले आहे. तसे नामाच्या अखंड सहवासाने त्याचे प्रेम आपोआपच येईल. उठता-बसता, चालता-बोलता, आपण अनुसंधान ठेवण्याचा प्रयत्न करावा. कोणतेही व्यसन कालांतराने पचनी पडते, आणि मग मनुष्य जास्त जास्त त्याच्या आधीन जातो. अफूचे पहा ! दिवसेंदिवस त्या माणसाला जास्त अफू लागते. त्याप्रमाणे भगवंताच्या चिंतनाचे आपल्याला व्यसन लागले पाहिजे. कोणतीही चांगली गोष्ट साधायला कठीण असणारच; पण अगदी थोड्या श्रमात पुष्कळ साधून देणारे नामासारखे दुसरे साधन नाही. म्हणून नेहमी मनाने नाम घेत असावे.

नामाचे प्रेम यायला, एक, गुरूंना ते आवडते म्हणून घ्यावे, किंवा दुसरे, नामातच माझे कल्याण आहे, या भावनेने घ्यावे.

***

॥ अध्यात्म ॥

मधुकर बोरीकर,
पुणे

आपले सण आपले उत्सव
पितृपक्ष

■ महालय किंवा पितृपक्ष : भाद्रपद महिन्यातील कृष्ण पक्षाचा काळ हा महालय म्हणून पुण्य काळ समजला जातो. या काळात सूर्य हा कन्या राशीत असतो.

कन्यागते सवितरि पितरो यान्ति वै सुतान्
शून्या प्रेतपुरी सर्वा यावद् वृश्चिकदर्शनम्

या काळात पार्वनविधीने श्राद्ध करणे पुण्य प्रद समजल्या जाते. एरवी मृत माता पित्याच्या मृत्यू तिथीनुसार वार्षिक श्राद्ध करताना सहा पिंडे तयार केली जातात. त्यात वडील आजोबा-पंजोबा व आई आजी पणजी अशी सहा व्यक्तींच्या नावे पिंडदान होत असते, पण पार्वण विधीत, म्हणजेच महालया दरम्यान हा केवळ पितृ त्रयी पुरता मर्यादित श्राद्ध नाही. धर्म सिंधूच्या महालय विधि मध्ये यासाठी अतिशय महत्त्वाचा स्पष्ट उल्लेख आहे.

त्यात सुरुवातीला हा क्रम येतो:

पितृ-पितामह-
प्रपितहानां...
मातृ-पितामही-प्रपितामही...
मातामह-मातृपितामह-मातृप्रपितामहानां

आणि त्यानंतर स्वतंत्रपणे पत्नी, पुत्र, कन्या, पितृव्य (काका), मातुल (मामा), भाऊ, आत्या, मावशी, बहीण, जावई, सासरे-सासू, आचार्य, उपाध्याय, गुरु, मित्र, शिष्य इत्यादी दिवंगत व्यक्तींचा ही निर्देश केला आहे.



"नमोनमो ते विकसित देश"

मित्रांनो, मी राजकीय लेख तुलनेने कमी प्रमाणात लिहिले आहे, तसे सर्वच पक्ष काय करतात?; संघ व देश आणिबाणी भाग 1/2; शिक्षण पर्यावरणावरील लेख; संविधान-स्वातंत्र्य इ.लेख आपल्या तरंगमधे आले आहेत. जास्त लेख मग अध्यात्म ते सुखदु:खाचे; जीवन जगण्याचे; अनुभव; वृद्धत्व आनंद; समाधान; अनुभव इ.सर्व विषयांवर आहेत. आजचा लेख मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी, त्यांचा प्रवास, खास पैलू,राजकारण व भारताचा विकास यावर आहे बघा पटते का?? मित्रांनो, आपणा सर्वांनाच भाजपा ,नरेंद्र मोदीजी आणि त्यांचे कार्य पाहात आहोत. विकास, प्रगती टप्पे,मोदीजी चा सार्वजनिक जीवनातील 25 वर्षाचा प्रवास सर्व जनतेसमोर आहे.ते सांगत बसत नाही.

नमोजीची काही वैशिष्ट्ये.

1)मोदीजी म्हणतात, ही माझी माणसे केवळ अडचणी सोडविण्यासाठी येत नाही, तर त्यांचं माझं आपुलकीचं नात आहे. संवाद साधणे, त्याच्या प्रश्नाला जबाबदारी मानणे, असे ते मानतात. 2001 रोजी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून सुरू झालेला हा प्रवास नैराश्याकडून आशेकडे, आशेकडून विश्वासाकडे व त्यातून संकल्पाकडे त्यांनी नेला आहे! 2014 पासून यातून लोकांना नवी दिशा आकार, नवी ऊर्जा दिली! 2047 पर्यंत विकसित भारत बनवून 140 कोटी लोकांच्या विकासाचा अर्थ म्हणजे गाव, गरीब शेतकरी महिला, तरूण, आदिवासी आणि समाजात शेवटच्या टोकावर ऊभ्या असलेल्या व्यक्तीला संधी देणे होय. असे मोदीजी वारंवार सांगत आलेले आहेत. आज एवढं पुरे करतो. आपण वाचत राहा सुख दु:खाचे तरंग माणसा-माणसाचे स्वस्थ राहा मस्त राहा. आपला दिवस आनंदी जावो हिच गुरू चरणी प्रार्थना करतो.



एक महिना चहा बंद केल्याने होऊ शकतात अनेक फायदे

ज्योतिर्मय साहित्य

आपल्यापैकी बरेच लोक दिवसाची सुरुवात एक कप गरमागरम चहाने करतात. चहाची चव इतकी आवडते की, अनेकांना दिवसातून अनेक कप चहा पिण्याची सवय असते. पण तुम्हाला माहित आहे का, चहाचे जास्त सेवन आपल्या आरोग्यासाठी हानिकारक असू शकते.

स्ट्रेस कमी करण्यासाठी चहा?

अनेकदा आपण स्ट्रेस कमी करण्यासाठी चहा पितो. पण चहामध्ये असलेले कॅफिन हे तत्व आपल्याला अधिक चिंताग्रस्त बनवू शकते. त्यामुळे झोप येण्यास अडचण येते आणि आपण अधिक थकलेले वाटतो. एक महिना चहा बंद केल्याने, आपला स्ट्रेस लेव्हल कमी होण्यास मदत मिळू शकते.

पचन तंत्राला द्या विश्रांती

चहाचे जास्त सेवन आपल्या पचन तंत्राला खूप त्रास देते. त्यामुळे ॲसिडिटी, गॅस आणि पोटात जळजळ यासारख्या समस्या उद्भवू शकतात. एक महिना चहा न पिल्याने, आपले पचन तंत्र निरोगी राहण्यास मदत मिळेल.



चांगली झोप येण्यासाठी

चहामध्ये असलेले कॅफिन आपल्या झोपेच्या चक्राला हानी पोहोचवते. त्यामुळे आपल्याला रात्री चांगली झोप येत नाही. एक महिना चहा बंद केल्याने, आपली झोप सुधारेल आणि आपण अधिक ऊर्जावान वाटाल.

डिहायड्रेशनची समस्या टाळा

चहामध्ये असलेले कॅफिन आपल्या शरीरातील पाणी शोषून घेते, ज्यामुळे आपल्याला डिहायड्रेशनची समस्या होऊ शकते. एक महिना चहा न पिल्याने, आपले शरीर हायड्रेटेड राहील.

हर्बल चहाचा पर्याय

जर तुम्हाला चहा पिण्याची सवय खूप लागली असेल तर तुम्ही हर्बल चहाचा पर्याय निवडू शकता. हर्बल चहामध्ये कॅफिन नसते आणि ते आरोग्यासाठी फायदेशीर असते.

एक महिन्यात होऊ शकतात अनेक बदल

एक महिना चहा बंद केल्याने आपल्या शरीरात अनेक सकारात्मक बदल होऊ शकतात. आपण अधिक निरोगी, ऊर्जावान आणि तणावमुक्त वाटू लागाल.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९



आईने तिच्या बाबांना लिहिलेलं पत्र...

ज्योतिर्मय साहित्य



आम्ही लातूरला असतानाची एक्कोनिशे पंच्याऩ्नवची म्हणजे मी इयत्ता पहिल्या वर्गात असतानाची काळजात रुतून बसलेली ही एक हळवी आठवण. आई पहाटे चारला उठायची. उठून स्वयंपाक, आमच्या शाळेचा डबा, आम्हाला शाळेसाठी तयार करणं, जेऊ घालणं ई. सकाळची सगळी कामं पटापट आवरून घ्यायची. सकाळची कामं म्हणजे आईच्या दोन्ही हातावर जणू खेळच खेळायची. आम्ही शाळेला निघताना अवघ्या दोन मिनिटात आई मला म्हणायची, ''राणी, मला एक आंतरदेशी कार्ड आणून देना माय''. माझ्या हातावर संत्री गोळीसाठी आईने पाच पैसे ठेवले कि मग काय पळत जाऊन आंतरदेशी कार्ड घेऊन पळत यायचे. मग आम्ही शाळेला गेलो कि आई आराम बाजूला ठेवून आमच्या आजोबांना म्हणजे आई तिच्या बाबांना पत्र लिहित असे. दुपारच्या जेवणाच्या सुट्टीत आम्ही घरी आलो कि खास करुन मी आईने आजोबांना लिहिलेलं पत्र आवर्जून वाचायचेच. त्या पत्रात आई लिहायची.

प्रिय बाबा, तुम्ही आणि माय बरे आहात का?. आम्ही सर्वजण इकडे जत्तन (आनंदी) आहोत. बाबा, तुमची आणि मायीची तब्बेत बरी आहे का?. दोघंही थोडंसं उशिरा उठत जा. जेवण वेळेवर करत जा. आजूबाजूच्या सर्वांना मी विचारले म्हणून सांगा. बाबा, मागे उन्हाळी सुट्टीत आम्ही आलो होतो ना. तेव्हा तुम्ही मला तुमचे दोन जुने धोतर दिले होते. हो कि नाही बरं. मग बघा ना बाबा मायीनं मला एकच धोतर दिलंय. आता मी कुरड्या, पापड कशावर टाकू. मला कांही कारण सांगू नका. मला अजून एक धोतर पाहिजे म्हणजे पाहिजेच.

बाबा, एक काम करा यावेळेला ना तुम्हीच या धोतर घेऊन. लेकीच्या घरी दोन दिवस राहून जा ना बाबा. माय तर काय कुठं जात नाही कांही नाही मायीलाही घेऊन या. मायीला म्हणा, चल संगुमाय कडं जाऊन येऊया दोन दिवस''. मग पेटीतलं गुलाबी रंगाचं लुगडं नेसून छान तयार



होईल माय. बाबा, येण्याआधी मला पत्र जरूर पाठवा. मी वाट बघते हं तुमच्या पत्राची. आणि बाबा मला लाल रंगाची एक साडीपण आणा. मायीला सांगू नका. नाहीतर ती खुप ओरडेल. माझं सामान तुमच्या शबनम मध्ये लपून ठेवा. आणि त्या चाचाकडं माझं ब्लाउज शिवायला टाका. माझे एक-दोन ब्लाउज मधल्या खोलीत वलानीवर ठेवले बघा तिथं.

आणि मला चहा-पत्ती ठेवायला एक छोटंसं स्टीलचं, एक जर्मनचं अशी दोन डबे आणा. आणि दोन रिबीनपण आणा. बाबा मागच्या अंगणात मी झेंडू, शेवंती, कनकमरालूच्या बिया टाकल्या आहेत. ती झाडे उगवली कि सांगा मला पत्रात. बाबा, शाळेला जाताना पोटभर जेवण करुन जात जा. शाळेत खुप काम असतं तुम्हाला. बाबा, काल पाळीमुळे माझं पोट खुप दुःखत होतं. आता कमी आहे. तुम्ही सांगितल्या प्रमाणे कोमट पाण्यात हळद टाकून पीत आहे. म्हणून आराम वाटत आहे.

बाबा, तुमची खुप आठवण येतेय हो. पहाटे पहाटे तुम्ही म्हणत असलेली गाणी खुप आठवतात. फाटकाजवळ तुम्ही पुस्तक वाचत बसलेलं चित्र अजूनही डोळ्यात सामावून ठेवलं आहे मी. बाबा, तुमची नातवंडंही खुप आठवण करतात हो तुम्हाला. कधी एकदा दिवाळीच्या सुट्ट्या लागतात आणि कधी एकदा मदनूरला येऊन तुम्हाला घट्ट मिठी मारते असं झालंय बाबा. काळजी घ्या, आरामात राहा.

आणि मायीलाही सांगा लवकर उठू नको म्हणावं. वेड्यासारखी तीनला उठून अंगण झाडून सडा-सारवण करत असते. बाबा, लेकरांना दिवाळीच्या सुट्ट्या लागल्या कि लगेच दुसऱ्या दिवशी निघणार आम्ही. चला बाबा थांबवते लिहिणं. लेकरं येतात दुपारच्या सुट्टीत जेवायला. बाबा माझं पत्र पोहोचलं कि लगेच मला पत्र पाठवून सांगा. काळजी घ्या बाबा. मी विचारले आणि आठवण केले म्हणून सांगा माझ्या मायीला.

आई आजोबांना लिहिलेल्या पत्रात काळजी, आठवण, हुरहूर असायची. प्रत्येक शब्द जीवंत भावना प्रकट करीत होता. पत्रात शब्द जरी असले तरी त्या प्रत्येक शब्दांमध्ये हळव्या भावना इतक्या भरलेल्या असायच्या कि वाचणाऱ्याच्या डोळ्यांना अश्रुंचं ओघळण देत असायच्या. खरंच काय काळ होता तो. एकमेकांच्या पत्राची वाट पाहण्याची मनाला लागलेली हुरहूर जीव कासावीस करुन टाकायची. त्या काळची पत्र म्हणजे शब्दरुपी जिवंत भावनाच होत्या.

आनंदी जीवन

ज्योतिर्मय साहित्य



जीवनात चटके बसत गेले तरच विवेक आणि वैराग्य याला प्रेरणा मिळत असते. अनुभव संपन्न आयुष्याची प्राप्ती होते. प्रत्येकाला सुखी आयुष्य हवे असतेच. ती अभिलाषा खरीही असते. पण त्या साठी काही प्रमाणात वृतस्थ मात्र रहावे लागते. ही गोष्ट ध्यानात घेवून खालील पांच गोष्टी आपल्या अंगी भिणवील्या पाहिजेत आणि वेळीच त्याचा उपयोग घेतला तर आत्म सुख काही प्रमाणात लाभल्या शिवाय राहणार नाही. १) वृद्धत्व येण्या पूर्वी तारुण्य पण २) रोग होण्या पूर्वी स्व आरोग्य ३) गरिबी पूर्वी संपन्नता ४) व्यग्र ते पूर्वी मोकळा वेळ ५) मृत्यु पूर्वी जीवन आनंदाने जगणे थोडक्यात वेळीच ह्या गोष्टी कराव्यात कारण वेळ कोणा साठी थांबत नसतो. त्यामुळे हातचा वेळ खर्च करण्यात काहीही अर्थ नसतोच . म्हणून आपल्या अपेक्षित प्रगति मध्ये बाधा आणू नका. कल करें सो आज कर हे तर आपल्याला माहीत आहेच.

वृतस्थ राहण्या बरोबरच ईश्वरी संकल्प या वर, ज्ञानावर विश्वास मात्र ठेवला पाहिजे. श्रद्धा ठेवली पाहिजे. दुर्लक्ष करून मात्र चालणारे नसते. आनंद हा ज्ञानावर आणि आपल्या श्रद्धेवर अवलंबून आहे. अर्जुना ने श्रीकृष्णाच्या ज्ञानावर संपूर्ण श्रद्धा, विश्वास, ठेवला त्याप्रमाणे वागला म्हणून त्याची वाटचाल विजयाकडे जाणारी ठरली. परिणामी त्याचा विजय झाला. तेव्हां शुद्ध ज्ञानावर आधारित असलेला विश्वास अडचणी ना तोंड देताना स्थिर, विवेकी, आत्मविश्वास पूर्ण, धैर्यवान बनवतो, इतकेच नव्हे तर पवित्र, निर्लोभ, आनंदी समाधानी जीवन जगण्याची प्रेरणा ज्योत उज्वल करतो. पण अंध श्रद्धेच्या जाळ्यात न अडकले पाहिजे कारण त्यामुळे फसगत होण्याची शक्यता जास्त असते.



आनंदासाठी आपल्याला प्राप्त सु संस्काराचा योग्य वेळ योग्य ठिकाणी उपयोग करणे किंवा करून घेणे गरजेचे आहे. आपल्या तील संस्काराचा खरा आनंद परोपकार करण्यात असतो. तेव्हा आपल्यातील कला कौशल्य यातुन इतरांचे जीवन फुलवून समर्पणाचा आनंद मिळविल्यास तो चिरकाल टिकणारा असतो. एखाद्याच्या जखमेवर फुंकर घातली तर त्यातून त्याला जो विसावा मिळतो समाधान मिळते, त्याच प्रमाणे आपले मनही आनंदी झाल्याशिवाय रहात नाही. तोच आनंद चिरकाल आपल्या स्मरणात राहतो. हे सत्य आपणा पैकी अनेकानी अनुभवले असेलच पण त्यासाठी अहंकार मात्र आडवा आणला न पाहिजे. नसता आनंदावर विरजण पडल्याशिवाय राहणार नाही. स्वार्था शिवाय दुःख वाटून घेण्याची आणि मनातून समर्पणाची भावना नेहमी जागृत ठेवली पाहिजे तरच आपण आपल्या आयुष्यातील आनंदी क्षण टिपू शकतो. तारुण्याचा उपयोग वेळींच केला पाहिजे, त्याच प्रमाणे गरिबी येण्या पूर्वी श्रीमंतीचा उपभोग घेतला पाहिजे, रोग होण्या पूर्वी आरोग्यदायी क्षणाचा उपयोग घेतल्यास आनंद मिळेल त्याच प्रमाणे व्यग्र होण्या पूर्वी असलेल्या वेळेचा चांगला, सकारात्मक उपयोग केला पाहिजे आणि मृत्यू पूर्वी आपल्या देहाला जपले पाहिजे. कारण ह्या गोष्टी आज ना उद्या होणारच आहेत त्यातून कोणीही सुटले नाही. एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की आपल्या कडे जे आहे ते पुरेसे आहे. हे जेव्हा तुम्हाला मनातून पटेल तेव्हाच आनंदाचा समाधानाचा ढेकर तुम्हाला आल्या शिवाय राहणार नाही.

यशस्वी जीवनात आनंद सामावलेला असतो कारण मनाची समाधानी त्यात निःशंक सामावलेले असते. पणती समाधानी मिळविण्यासाठी उपरोक्त पंचसूत्रा ची आठवण ठेवून आपले आचरण ठेवले पाहिजे. शरीर निरोगी ठेवले पाहिजे कारण आनंदी जीवन जगण्याची, यशाची, आनंद पर्वणी असून हीच खरी गुरुकिल्ली आहे. त्याचबरोबर नाती आणि. जपणे, संवाद साधने, प्रेमा ने जपले पाहिजे. आपल्यासाठी थोडा वेळ वाचवून त्याचा आपल्या छंदासाठी उपयोग केला पाहिजे. आपली मानसिक शांतता जपली पाहिजे. एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की आनंद टिकवणे साठी सुदृढ शरीर नसेल व्यथे ने भरलेले मन असेल तर आनंद सापडण्या साठी चाचपडत फिरावे लागेल आणि हे टाळा वयाचे असल्यास लक्षात ठेवा.

कामासाठी जीवन जगण्या पेक्षा आनंदाने जगण्यासाठी काम करा. मर्यादा राखल्या शिवाय आनंद मात्र आपल्या वाट्याला येणार नाही.


होता जीवा-म्हणून वाचला शिवा, वैजापूरात शिवरत्न जिवाजी महाले यांना अभिवादन


ज्योतिर्मय साहित्य




वैजापूर - हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अनेक रत्नातील वीर रत्न जिवाजी महाले यांच्या जयंतीनिमित्त लाडगाव रस्ता या ठिकाणी शुक्रवार (ता०-९) सकाळी दहा वाजता जिवाजी महाले पुतळ्याला शहरातील सर्व थरातील नागरिक यांनी एकत्र येत अभिवादन केले. शिव-फुले-शाहू-आंबेडकर विचार मंच व नाभिक महामंडळ यांच्या वतीने आयोजित या प्रसंगी सर्व प्रथम पालिकेचे गट नेते व भाजपा जिल्हा सरचिटणीस दशरथ बनकर, नगरसेवक राजेश गायकवाड, डॉ,.बी.बी. शिंदे, तालुकाध्यक्ष संदीप ठोंबरे यांनी जिवाजी महाले यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.जेष्ठ नागरिक व सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांनी प्रतापगडाच्या पायथ्याशी अफजलखान व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भेटीचा प्रसंग कथन करून जीवा महालेंनी बडा सय्यद याचा शिवाजी महाराजांवर होणारा वार आपल्या अंगावर घेऊन जिवाजी महाले यांनी एका घावात त्यास जागच्या जागी ठार केले, शिवाजी महाराज यांचे प्राण जिवाजी मुळे वाचले पण जीवा महाले धारातीर्थी पडले.म्हणून ''होता जीवा -म्हणून वाचला शिवा''अशी म्हण प्रचलित झाली. शिव- फुले- शाहू- आंबेडकर विचार मंचचे दिलीप अनर्थे, अण्णासाहेब ठेंगडे, सुधाकर आहेर, रणजित मथुरिया, रमेश तोडकर,, बाबासाहेब गायकवाड प्रा, प्रमोद पठारे यांनी सहभाग नोंदविला. या प्रसंगी अशोक पवार खंडाळकर, देवीदास अनर्थ, गणेश अनर्थे, भास्कर खरात सुनील वाघ, मंजुषा ढाकरे, भारती कदम, हेमंत वैद्य, दिलीप विश्वासू,सुनील व्यवहारे, औदुंबर विश्वासू, काशिनाथ गावित,चंद्रकांत अनर्थे, मंजुषा ढकरे ,भारती कदम यांनीही अभिवादन केले.











दवाखाना

कॉलरा (६)

ज्योतिर्मय साहित्य

नमस्कार मैत्रांनो!

आपण कॉलरा या संसर्गजन्य रोगाविषयी जाणून घेत आहोत. या रोगावर मात करायची असेल तर त्यापासून बचाव अतिशय महत्वाचा आहे. कारण ''उपायापेक्षा प्रतिबंध चांगला'' हेच खरे. इथे वैयक्तिक पातळीवर स्वच्छ पाणी, अन्न आणि वैयक्तिक स्वच्छतेचे महत्व जाणून घेणे आवश्यक आहे. पावसाळ्यात याची अधिक काळजी घ्यायला हवी.

*नेहमी उकळलेले (किंवा वॉटर फिल्टरचे) पाणी प्यावे. पाणी खळखळून उकळेपर्यंत वाट बघावी. त्यानंतर ३ मिनिटे ते उकळू द्यावे जेणेकरून त्यातील जिवाणू आणि हानिकारक सूक्ष्मजीव नष्ट होतील. उकळल्यानंतर पाणी पूर्णपणे थंड होऊ देऊन मगच प्यावे. पाणी ज्यात साठवलेले जाते ते भांडे स्वच्छ असावे आणि नेहमी झाकून ठेवावे.

*आपण जे अन्न खातो ते नेहमी ताजे, गरम आणि झाकलेले असावे. बाहेरील उघड्यावरील अन्नपदार्थ खाणे टाळावे. कापून ठेवलेली फळं खाऊ नयेत

*शौचास जाऊन आल्यानंतर आणि जेवणापूर्वी हात साबणाने स्वच्छ धुवावेत.

वरील तिन्ही मुद्यांवर टायफॉईडवर चर्चा करतांना सविस्तरपणे वर्णन केलेले आहेच.

*पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांमध्ये मलमूत्र मिसळले जाणार नाही, याची काळजी घेतल्यास पटकीचा प्रसार नक्कीच रोखता येतो. निसर्गत: सागरी खेकडे, खुबे आणि तिसऱ्यांच्या सागरी कवचधारी प्राण्यांच्या शरीरावर पटकीचे जिवाणू आढळतात. पटकीचा संसर्ग टाळण्यासाठी त्यांचा वापर करण्याआधी ते स्वच्छ धुवून घ्यावेत. पिण्याच्याआणि वापराच्या पाण्याचे क्लोरिनीकरण करावे.

* कॉलरा हा रोग प्रामुख्याने दूषित पाणी आणि अस्वच्छता या दोन कारणांमुळे होतो. संक्रमित माणसाच्या शौचातून हा वातावरणात प्रवेश करतो. शुद्ध पाणी, स्वच्छता आणि सामाजिक जागरूकता या त्रयीचा योग्य उपयोग केल्यास कॉलरा नियंत्रणात आणला जाऊ शकतो. सामाजिक स्तरावर सुरक्षित, प्रक्रिया केलेले पिण्याचे पाणी आणि योग्य स्वच्छता ही मुख्य संरक्षण उपाययोजना आहे. जास्त धोका असलेल्या भागात प्रवास करणाऱ्या किंवा राहणाऱ्या व्यक्तींसाठी तोंडावाटे घ्यावयाची कॉलरा लस उपलब्ध आहे. पाण्याच्या साठ्यामध्ये मलमूत्र येणार नाही



याची काळजी घेतल्यास पटकीचा प्रादुर्भाव होत नाही. पिण्याच्या आणि वापराच्या पाण्यावरील क्लोरिनीकरणामुळे पटकी जिवाणू नष्ट होतात. त्याचप्रमाणे विषाणू आणि जिवाणू प्रतिबंधक अतिनील किरण उपचार, आणि आधुनिक फिल्टरसारख्या उपायामुळे पटकी जिवाणूंचा प्रादुर्भाव कमी झाला आहे. सार्वजनिक आरोग्य खाते याची पाहणी करून उपाययोजना करीत असते. मात्र यात सर्वसामान्यांचा सहभाग अतिशय महत्वाचा आहे.

कॉलरा विरुद्ध उपलब्ध लसींची थोडक्यात माहिती घेऊ या

सध्या जागतिक स्तरावर प्रामुख्याने तोंडावाटे दिल्या जाणाऱ्या लसींचा वापर केला जातो:

*इनॲक्टिव्हेटेड किंवा किल्ड लसींमध्ये मृत जिवाणू असतात. पूर्ण संरक्षणासाठी या लसींचे २ डोस २ आठवड्यांच्या अंतराने देतात. २ ते ५ वर्षांच्या मुलांना तिसरा डोस देखील देण्याची शिफारस केल्या जाते.

शँकोल: ही भारतात मोठ्या प्रमाणावर वापरली जाणारी आणि तोंडावाटे दिली जाणारी अत्यंत प्रभावी लस आहे. याचे दोन डोस कॉलराविरूद्ध सुमारे ६५% ते ६९% पर्यंत दीर्घकाळ संरक्षण प्रदान करतात.

हिलकोल ही भारत बायोटेकने विकसित केलेली तोंडावाटे देण्यात येणारी नवीन लस आहे. ही ओगावा आणि इनाबा या दोन्ही कॉलराच्या स्ट्रेनविरुद्ध प्रभावी प्रतिकारक्षमता देते.

डुकोरल: ही जगभरात मान्यताप्राप्त असलेली आणखी एक तोंडावाटे दिली जाणारी लस आहे, जी प्रौढ व मुलांमध्ये संरक्षण देते.

जागतिक आरोग्य संघटनेद्वारे मान्यताप्राप्त या लसी अत्यंत प्रभावी आहेत. याचे २ डोस पूर्ण केल्यास साधारण ६५% पर्यंत मजबूत संरक्षण मिळते. २ डोस घेतल्यानंतर याचा प्रभाव ३ ते ५ वर्षांपर्यंत राहतो.

*लाइव्ह अटेन्युएटेड लसीत प्रयोगाद्वारे कमकुवत केलेले जिवंत जिवाणू असतात. याचा केवळ १ डोस तोंडावाटे दिला जातो. या लसीचे २ डोस (प्रौढांसाठी) घेतल्यानंतर साधारणपणे ८०% ते ८५% पर्यंत संरक्षण मिळते.

वॅक्सचोरा: ही कॉलराची एकमेव मान्यताप्राप्त लाईव्ह ॲटेन्युएटेड लस आहे.

ही लस तोंडावाटे एकाच डोसमध्ये दिली जाते आणि ती कॉलरामुळे होणाऱ्या तीव्र जुलाबांपासून उत्तम संरक्षण देते. लस घेतल्यावर १० दिवसांपर्यंत कॉलराच्या जिवाणूंविरुद्ध ९०% पेक्षा जास्त परिणामकारकता दिसून येते. ३ महिन्यांनी याची परिणामकारकता सुमारे ८०% पर्यंत राहते. मात्र या लसीच्या दीर्घकालीन प्रभावाबद्दल, म्हणजेच ३ महिन्यांनंतर मर्यादित माहिती आहे. म्हणूनच ही लस प्रामुख्याने अल्पकालीन वापरासाठी स्थानिक पातळीवर कॉलराचा अधिक प्रादुर्भाव असलेल्या किंवा विशिष्ट काळात कॉलराची साथ आलेल्या भागात प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी वापरली जाते.



लेखिका
डॉक्टर मीना श्रीवास्तव

कॉलराची लस कोणाला देण्यात यावी?

*पूर, नैसर्गिक आपत्ती किंवा अकस्मात आलेले मानवतावादी संकट या भागातील लोकांना जेथे नैसर्गिक रित्या शुद्ध पिण्याचे पाणी असल्याची शाश्वती नसते

*कॉलरा प्रभावित क्षेत्रात काम करणारे आरोग्य कर्मचारी आणि मदतनीस.

*पंढरपूर यात्रेदरम्यान पूर्वी सर्वच भाविकांना पटकी प्रतिबंधक लस दिली जात असे, परंतु ती विशेष प्रभावी नसल्याने पटकी रोखण्यासाठी लसीपेक्षा स्वच्छता अधिक महत्त्वाची मानली जाते. या अंतर्गत पिण्याच्या पाण्याचे शुद्धीकरण (क्लोरीनेशन), पाण्याच्या साठ्यांची नियमित तपासणी आणि यात्रेच्या ठिकाणी कडक स्वच्छता राखण्यावर भर दिला जातो. वारी किंवा यात्रेदरम्यान एखाद्या भाविकाला जुलाब किंवा उलट्यांचा त्रास झाल्यास उपलब्ध स्थानिक शासकीय वैद्यकीय कक्षात ताबडतोब जलसंजीवनी आणि प्रतिजैविके मोफत पुरवली जातात.

कॉलराची लस सुरक्षित आहे. पण काही व्यक्तींमध्ये खालीलप्रमाणे सौम्य दुष्परिणाम लक्षणे दिसू शकतात:

*पोटात दुखणे किंवा मळमळणे

*सौम्य अतिसार (जुलाब) किंवा उलट्या

*थकवा आणि डोकेदुखी

मंडळी, कॉलरा प्रतिबंधक लस असो उपचार, त्यांच्या मर्यादा आहेत, सर्वप्रथम आणि सर्वाधिक महत्वाच्या स्वच्छतेची महिमाच अपरंपार आहे.

***

पंजाबी रेड ग्रेव्हीचे इन्स्टंट प्रिमिक्स

ज्योतिर्मय साहित्य

हल्ली मुलांनाच काय मोठ्यांना सुद्धा मधूनच कधीतरी हॉटेलमध्ये जाऊन पंजाबी भाजी खाण्याचा मोह होतो. पण नेहमी हॉटेल मध्ये जाणे शक्य होत नाही. पण खाण्याची इच्छा तरी तीव्र असते. अशावेळी काय करावे? त्यासाठी आज आपण रेड पंजाबी ग्रेव्हीचे प्रिमिक्स बनवून ठेवू. म्हणजे कधीही अचानक खाण्याचा मोह झाला,तरी झटपट भाजी बनवू शकतो, तीसुद्धा अगदी हॉटेल मधल्यासारखी ! पहायचे ना?



साहित्य:

पाव वाटी सुका, वाळवलेला कांदा, पाव वाटी मगज बी, २ चमचे तीळ, १ चमचा लाल काश्मिरी मिरचीचे तिखट, १ चमचा जिरे पावडर, २ चमचे धने पावडर, २ चमचे गरम मसाला, चिमूटभर कसुरी मेथी, २ चमचे कॉर्न फ्लोअर, चिमूटभर मिठ.

कृती:

कांदा जर नरम पडला असेल तर आधी तो ओव्हन मध्ये ३० सेकंद किंवा १ मिनिट ठेवावा. थंड झाला की कुरकुरीत



बनतो. मग हा कांदा मिक्सरच्या छोट्याभांड्यात फिरवून बारीक करावा. नंतर त्यातच तीळ मगज बी घालून व्हायपर वर थोडे थोडे फिरवून बारीक करून घ्यावे. मग त्यातच लाल तिखट, मिठ, धने, जिरे पावडर, गरम मसाला, कसुरीमेथी सगळे घालून पुन्हा व्यवस्थित फिरवुब मिक्स करून घ्यावे. शेवटी खाली काढून थंड झाल्यावर हवाबंद डब्यात भरून ठेवावे.

वैशिष्ट्य:

हे प्री मिक्स भरपूर दिवस व्यवस्थित राहते

कोरडेच असल्यामुळे छान राहते. आपल्याला लागेल तसे घेऊन पुन्हा घट्ट झाकण लावून ठेवावे. कोणत्याही नॉर्थ इंडियन डिशेश मध्ये, पनीर मटार,आलू मटार,पनीर मखणी, पनीर बटर मसाला अशा भाज्यात याचा वापर करून सुरेख भाज्या आपण मनात आले की लगेंच आणि भरपूर प्रमाणातसुद्धा बनवू शकतो.

या भाज्या शक्यतो बटर मध्ये केल्या तर टेस्ट मस्त येते. चटपटीत,थोडिशी स्पायसी अशी ग्रेव्ही खाऊन नक्कीच खुश होतील सगळेजण.

जिल्हास्तरीय रोलर स्केटिंग स्पर्धेत एकलव्य स्केटिंग अकॅडमीचे घवघवीत यश

विविध वयोगटांत खेळाडूंची पदकांची लयलूट; सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदकांवर कोरले नाव

ज्योतिर्मय साहित्य

जळगाव (गोकुळसिंग राजपुत) : शालेय जिल्हास्तरीय रोलर स्केटिंग स्पर्धेत एकलव्य क्रीडा संकुल येथील एकलव्य स्केटिंग अकॅडमीच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत विविध वयोगटांत सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदकांची कमाई केली. खेळाडूंनी आपल्या कौशल्याच्या जोरावर स्पर्धेत यश संपादन करून अकॅडमीचा नावलौकिक वाढविला.



पदक विजेत्या खेळाडूंची नावे पुढीलप्रमाणे :

११ वर्षांखालील मुले क्वाड स्केट्स : नील चौधरी (सुवर्णपदक), जेनिश बाविस्कर (रौप्यपदक) आणि वेदर्श राणे (कांस्यपदक). १४ वर्षांखालील मुले इनलाईन स्केट्स : अथर्व किंनगे (रौप्यपदक). १७ वर्षांखालील मुले इनलाईन स्केट्स : अथर्व आमले (कांस्यपदक).


११ वर्षांखालील मुली क्वाड स्केट्स : अन्वी लाठी (कांस्यपदक). ११ वर्षांखालील मुली इनलाईन स्केट्स : मायरा चौधरी (रौप्यपदक).१४ वर्षांखालील मुली इनलाईन स्केट्स : ओजल तळेले (रौप्यपदक).१४ वर्षांखालील मुली क्वाड स्केट्स : जिया लोहार (सुवर्णपदक) आणि भक्ती पाटील (रौप्यपदक).

१७ वर्षांखालील मुली क्वाड स्केट्स : जान्हवी चिंचोलकर (सुवर्णपदक).१९ वर्षांखालील मुली इनलाईन स्केट्स : तेजस्विनी सोनवणे (सुवर्णपदक) आणि पूर्वा राऊळ (रौप्यपदक).

या सर्व खेळाडूंनी विविध गटांत पदके मिळवत आपली क्रीडाक्षमता सिद्ध केली. त्यांच्या या यशामुळे एकलव्य स्केटिंग अकॅडमीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

एकलव्य क्रीडा संकुलाचे प्रशासकीय अधिकारी प्रा. डॉ. श्रीकृष्ण बेलोरकर यांनी सर्व पदकविजेत्या खेळाडूंचे हार्दिक अभिनंदन केले.

तसेच खेळाडूंनी भविष्यातही अशीच उत्कृष्ट कामगिरी करून उच्च स्तरावरील स्पर्धांमध्ये यश संपादन करावे, अशा शुभेच्छा दिल्या. खेळाडूंच्या या यशामुळे अकॅडमीमध्ये आनंदाचे वातावरण असून, त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीसाठी सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे



कुटुंबप्रमुख हवा आहे!- भाग ७ : मनावर संस्कार

ज्योतिर्मय साहित्य

''मुलांनो, काल आपण भारतीय संस्कृतीविषयी बोलत होतो. संस्कृती ही खूप विशाल आणि सर्वसमावेशक कल्पना आहे. आपली खाण्याची पद्धत, पोशाख, सण-उत्सव, वागण्या-बोलण्याच्या पद्धती, विवाहसंस्था, घरातील सदस्यांचे परस्परांशी संबंध आणि समाजात बोलल्या जाणाऱ्या भाषा, हे सगळं संस्कृतीचाच भाग आहे.''

''मामा आजोबा, भाषा?'' श्रीरामने विचारलं.

''हो श्रीराम. भाषा तर संस्कारांचे अत्यंत महत्त्वाचे माध्यम आहे. भाषेच्या माध्यमातूनच एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे अनेक गोष्टी पोहोचतात.''


''पिढी म्हणजे काय?'' श्रुतकीर्तीने विचारलं.

मामा आजोबा हसले. ''असं बघ. माझ्या आणि मामी आजीच्या पुढची पिढी म्हणजे तुमच्या आई-बाबांची पिढी. आणि त्यांच्या पुढची पिढी म्हणजे तुमची.''

''म्हणजे आपल्या पुढे आणि मागे असतात त्या पिढ्या?'' श्रीरामने विचारलं.

''अगदी बरोबर!''

''मग ते कालचे समर्थ रामदासस्वामी, संत तुकाराम महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल तुम्ही सांगणार होतात ना?'' श्रुतकीर्तीने विचारलं.



''सांगणार आहे ना! आम्ही लगेचच भारतात परत जाणार नाही,'' मामा आजोबा म्हणाले.

''मग खूप दिवस राहा तुम्ही दोघं!'' म्हणत श्रुतकीर्ती आजोबांच्या मांड्यावर येऊन बसली.

''आजोबा, ते मनाचे श्लोक आणि मनावर संस्कार सांगा ना,'' श्रीरामने हट्ट धरला.

''श्रीराम, माणसाचं मन अत्यंत चंचल असतं. ते एका क्षणात अमेरिकेतून जपानमध्ये किंवा भारतात कुठेही जाऊ शकतं वाऱ्यासारखं.''

''मग मनावर नियंत्रण कसं ठेवायचं?'' श्रीरामने विचारलं.

''त्याचं एक शास्त्र आहे. आपल्या पातंजल योगसूत्रांमध्ये म्हटलं आहे 'योगश्चित्तवृत्तिनिरोधः।' मनाच्या चंचल वृत्तींवर नियंत्रण मिळवण्याचा हा विचार फार प्राचीन आहे.''

''पण ते कसं शक्य आहे?''

मामा आजोबांनी विचारलं, ''एअरबस ए-३२० निओचा वेग किती असतो?''

''चार-पाचशे किलोमीटर प्रतितास असेल?''

''साधारण ८४० ते ९०० किलोमीटर प्रतितास! तरी वैमानिक त्या वेगवान विमानावर नियंत्रण ठेवतो.''

''मग मनावरही नियंत्रण ठेवता येतं?''

''हो. मनाच्या नियंत्रणाचं एक विज्ञान आहे आणि ते संस्कारांनी साधता येतं.'' श्रीरामच्या डोळ्यांत कुतूहल चमकलं.

''ते कसं?''

''ते उद्या सांगतो. आता दहा वाजलेत. तुला उद्या शाळा आहे. चल, झोपायला जा.'' त्या रात्री श्रीरामच्या मनात एकच प्रश्न घोळत राहिला मनावर संस्कार नेमके कसे करायचे?

क्रमशः भाग ८ : मनाचे श्लोक

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

* कृष्णमय *

कृष्णवर्ण कांती । मोरपंख शिरी।
कान्हा गिरीधारी। ।।गोकुळीचा ।।१।।

दही दूध लोणी । चोरीतो खट्याळ ।
बाळ लडिवाळ । यशोदेचा।।२।।

यमुनेच्या तीरी । वाजवी बासरी।
मुकुंद मुरारी । प्रिय सखा ।।३।।

रासलीला न्यारी। रमलेली राधा।
गोपिकांना साधा। भासे कृष्ण ।।४।।

राधेचा तो श्वास । बासरीचा नाद ।
प्रीत अनुवाद । एकजीव।। ५।।

सौभाग्य अखंड । रूक्मिणीस प्राप्त ।
सत्यभामा व्याप्त । कृष्णरंगी ।।६।।

सुदाम्याची झोळी। भरीतो प्रेमाने ।
मैत्रीही जपणे । कृष्णासवे ।।७।।

द्रौपदीचा बंधू । धावला त्वरित ।
टळे अकल्पित । घेता नाम ।।८।।

पार्थाचे सारथ्य । धारीष्टय सत्याचे।
जीवन मूल्यांचे । गीतामृत ।।९।।

पावन भूमीत । सत्कर्म जतन।
अधर्म पतन। करीतसे ।।१०।।

जगन्नाथ कृपा। युगांतरे भिन्न ।।
भक्त होती धन्य । कृष्णमय।।११।।

@ काव्यप्रतिभा
सौ.प्रतिभा म. चौगले
कोल्हापूर

भावबंध

मंद मंद गंध, धुंद धुंद बेधुंद
चिंबचिंब ओलेचिंब, रंध्र रंध्र सैरंध्र
रूप रूप अनुरूप, नाद नाद अंतर्नाद
सूर सूर सप्तसूर, बिंब बिंब प्रतिबिंब

श्वास श्वास उच्छवास , ध्यास ध्यास अंतर्ध्यास
रंग रंग सप्तरंग, तरंग तरंग अंतरंग
शोध शोध आत्मशोध , राग राग अनुराग
वाट वाट मखमाली वाट , काठ काठ काठोकाठ.

शब्द शब्द शब्दबंध, छंद छंद आत्मछंद
तृप्त तृप्त अंतरात्मा, शांत शांत आत्मानंद
मीत मीत मनमीत, लीन लीन आत्मलीन
दीप दीप धुपदीप, संग संग सत्संग

रंग रंग अंतरंग, बंध बंध मर्मबंध
बंध बंध रेशीमबंध, भाव भाव भावबंध
गीत गीत संगीत, साद साद प्रतिसाद
ताल ताल सुरताल, प्रित प्रित अमरप्रित.

©शेखर देशपांडे

ते गेल्यावर

प्रचंड आदर वाटतो ते गेल्यावर (१)
स्तुतिभुमने वाहायची ते गेल्यावर

आभाळाएवढे कर्तृत्व नाना प्रकारे (२)
आज आमच्या ध्यानीमनी ते गेल्यावर

परखड सडेतोड बोलणे नेहमी (३)
पटू लागले आम्हां सारे ते गेल्यावर

नायक, खलनायक की चरित्रनायक (४)
सच्चा माणूस समजला ते गेल्यावर

साधी राहणी अन आगळे जिणे त्यांचे (५)
सर्वापर्यत पोहचले ते गेल्यावर

दानशूर सामाजिक थोर व्यक्तिमत्व (६)
कबूल केले कुणी कुणी ते गेल्यावर

नव्वा संकल्पना होत्या ज्यांच्या स्वप्नामध्ये (७)
आता त्या अंमलात आणा ते गेल्यावर

नटसम्राट हरपला दुःख मनाला (८)
श्रद्धांजली वाहतो त्यांना ते गेल्यावर

नाना

अरविंद कुळकर्णी

दादा गेले नाना गेले

****

दादा गेले नाना गेले,
डोळ्यांत अश्रू दाटून आले,
दिलखुलास प्रेमळ माणसं
आठवणींचे दीप पेटवून गेले

एकदाच हा जन्म अपुला
माणसं जोडतच वागावे
दोन वेळच्या भाजी भाकरीत
सुखाचं जगणं हो शोधावे

पैसा अडका बंगला गाड्या
काय सोबत आहे न्यायचे?
रित्या हाती आलो आहोत
रित्या हाताने आहे जायचे

नाही क्षणाचा भरवसा येथे
आज आहे तर उद्या नाही
मग का जीवाचा आटापिटा?
येणार तर सोबत काही नाही

नाना सांगून गेले आम्हा
शब्द अजून गुंजती कानात
ओंजळीत मावेल तेवढेच ठेवावे
बाकी गरजूंना दयावे दानात

गिरीश वसेकर
९२८४७४२९७७

चित्रकविता

शांत, प्रशांत निद्रा की विचारांचे मंथन हे ?
विश्वनियंत्या पुरुषाचे असीम सुंदर स्वरुप हे....

आकर्षणाचा केंद्रबिंदू हा महाविष्णु पहुडला जरा
नेत्राला दिसताक्षणी हा माया कोलाहल विरला....

आदीशक्ति महालक्ष्मी सावरि भार जगताचा.
बालक होऊन भक्त बोलती गजर आदीमायेचा ....

विचार आता कसला करता विश्वाच्या संहाराचा?
'माझे कार्य सृजनाचे, विचार करतो भक्तांचा'...

'दयानिधी' हे नाव सार्थकी करणे माझे वचन असे
प्रेमाचे हे कार्य अविरत निद्रा जरि मम भासतसे....

सर्जन माझी धरा तशी सागर, पर्वत ह्या सरिता
मनुष्य प्राणी दुखवित मजशी त्रस्त करितसे मम गात्रा...

भाविक भक्त जन माझे हे कृतार्थ करिती मम हृदया
चिंतन त्यांचे करून होतसे मोदमय विश्राम सख्या...

आत्मशक्तीचे भान ठेवुनी गातिल गीते मम भक्त
हीच शांतता, असिम निळाई मिळे बालका अनुरक्त...

एक वचन हे, हाच धर्म ही पालन त्याचे मी करतो
ह्या वचनांवर जो विसावे रक्षण त्याचे मी करतो....

स्वधर्म पालन करण्यासाठी उत्पत्ती चे हे काम
पूर्ण करोनी ये तू सखया त्यासाठी हा विश्राम ...

आस असे ही भेटीची रे जशी तुला मजहि तशी
बालक हा असा बघोनी आठवती मज चकोर शशी

जाणिव माझ्या या लीलांची ज्या सद्भक्त होत असे
त्या साठी विश्राम समज हा वाट सतत मी पहात असे...

शांत प्रशांत निद्रा की विचारांचे मंथन हे ?
विश्वनियंत्या पुरुषाचे असीम सुंदर स्वरुप हे...
विश्वनियंत्या पुरुषाचे असीम सुंदर स्वरुप हे...

भगवंत हृदयस्थ आहे 🙏
अपर्णा परांजपे पुणे

मन-ईश्वरभक्ती

(भुजंगप्रयात वृत्त, अक्षरे-१२ मात्रा २०(लघुगुरू सुट घेऊन)
लगावली-लगागा लगागा लगागा लगागा)

तुझे नाम घेता मना हर्ष दाटे
तुझ्या चिंतनी सौख्य भक्तीत वाटे --धृ --

तुझे रूप ध्यानी सदा आळवावे
तरूनी भवाशी,सदा मुक्त व्हावे
नको द्वेष ईर्षा, मनी प्रेम साठे
तुझ्या चिंतनी सौख्य भक्तीत वाटे ----१

अनाथा करीशी,कृपा तू अनंता
तुची आत्मरूपी दयाळू महंता
करी दूर मार्गातले विष न काटे
तुझ्या चिंतनी सौख्य भक्तीत वाटे ---२---

वरदहस्त ठेवी,करुणाकरा तू
मनाला तनाला शुचिर्भूत कर तू
तुझ्या संगतीने धरी धीर फाटे
तुझ्या चिंतनी सौख्य भक्तीत वाटे ---३---

अशांत मनाला,तुझा ठाव तारी
असे तू नियंता,दुरीतांतकारी
नामात तुझीया,रमूनी पहाटे
तुझ्या चिंतनी सौख्य भक्तीत वाटे ----४

तुझे नाम घेता मना हर्ष दाटे
तुझ्या चिंतनी सौख्य भक्तीत वाटे

— श्रीमती सुलोचना लडवे,
अमरावती

अंतरीचा ज्ञानसखा

अंतरीचा ज्ञानसखा
प्रबुद्ध थोर वाटतो,
कालिदास भवभूती
अंतरात राहतो....

एक अणु विश्वरूप
विष्णुरूप अणूमध्ये,
दिव्यशक्ती स्थिर चित्त
अंतरात वाटते....

मेघरंग मानसी
तोच मनात राहतो,
भक्तांचा प्रियसखा
अंतरात राहतो.....

कालिदास
भवभूती

शांडिल्यगोत्रोतपत्रभालेरावमुकुन्दोऽहम्
छत्रपतीसंभाजीनगरम्
विद्युतसंदेशसंकेसूत्रम्: bhalerao.mukund@gmail.com
भ्रमणभाषक्रमांक: ८३०८८३५३१३

वृक्ष लावा... जीवन वाचवा...

झाडे लावा,
पाणी जपा,
पर्यावरण वाचवा...

दुष्काळाच्या उष्ण झळा
जणू अग्नीचा हा डोंब
करपली काळी आई
जळे गर्भामध्ये कोंब

तोडू नको वृक्ष वल्ली
नको विकास बहाणा
कर वृक्षांचे रोपण
आता तरी हो शहाणा

मित्र वृक्षच आपले
ठेव मित्रत्वाची जाण
खुलू दे धरती वर
नवीन हिरवे पान

शुष्क झाली सारी भुई
तडे काळजात खोल
थेंब थेंब या पाण्याचे
कळे जना आता मोल

मात दुष्काळाशी कर
झाडे लावून वाढवं
थेंब पाण्याचे आडवं
तुझे भविष्य घडवं

झाडे वाढवा धरती वाचवा

श्री. युवराज गोवर्धन जगताप
काटेगाव ता:-बार्शी
जिल्हा:-सोलापूर
8275171227

युद्ध की बुद्ध

सामान्यांना नकोच असते, महा विनाशकारी युद्ध ।
वेळ आली असे ठरविण्या, युद्ध हवे की हवाय बुद्ध ।।१।।
युद्ध हवे असते नेत्यांना, ज्यांची बाळे सुखे लोळती ।
निज बाळांना दुःखी करूनी, जवान सीमेवरती मरती ।।२।।
भगवंताने दिधले असते, प्रत्येकाला पोटापुरते ।
असे असूनही का नेत्यांना, अधिकाची ती हावच सुटते ।।३।।
विनाकारण लढण्याचा ह्या, कलियुगाला शाप असे ।
काळ्या सोन्यासाठी लढती, भरण्यासाठी रिक्त खिसे ।।४।।
प्रत्येकास जगण्याचा हक्क, भगवंताने असे दिधला ।
हे कोण शहाणे ठरवू बघती, कोण बुरा नि कोण भला ।।५।।
ह्यांच्या मते जो असतो वाईट, त्याचे हे करती निर्दालन ।
साम-दाम-दंड वापरती, साऱ्या जगास वेठीस धरून ।।६।।

© माधव मनोहर जोशी.

यल्लमा/रेणूका आरती

तुज आळवितो माते
परशुरामाची जननी..२..
पंचारती ओवाळते..२..
जीवे भावे यल्लमा आई।।१।।
जय देवी जय देवी
जय यल्लमा आई ।
जय यल्लमा आई ।
पंचारती ओवाळते ।
जीवे भावे यल्लमा आई।।धृ।।
सौदत्तीच्या डोंगरावरी
तू ठाण मांडलं बाई..२..
सत्यव्वा अन् मातंगी..२..
समीप आहेत दोघी..।।२।।
तू यल्लमा तूच रेणूका
पुण्य क्षेत्र माहूराला..२..
भक्तांचा तो पूर लोटतो..२..
मोठा तुझा गोतावळा ।।३।।
शक्तीरुपी तू आमुची
कुलस्वामिनी जगदात्री..२..
धर्म अर्थ काम मोक्षार्थ..२..
हाती जणू तू चिंतामणी..।।४।।
काय वर्णू तुझे रुप
तोकडे शब्द मजकडे..२..
आदीशक्ती देवी भगवती..२..
पायी मजला ठाव देई ।।५।।
(किंवा)दत्ता ठाव मागे पायी....

©®दत्ता तरळगट्टी
पंढरपूर ९८८१६२९०४८

गद्य पद्यातून फुले वल्लरिणी

सोज्वळ, सुंदर
रसिक मोहिनी
स्वप्नफुलासम
काव्यकमलिनी

सुवर्ण कोंदणी
शब्द अलंकार
मधुर भाषिणी
भाषा उपहार

हिरे मौक्तिकांचा
जणू चमत्कार
मराठी अक्षरे
रुप कणीदार

कधी तळपती
तेज तलवार
कधी आडमुठी
रांगडी गवार

कधीकाना, मात्रा
ॐकार,आकार
वेलांटी, उकार
एकार, रफार

म्हणी वाक्प्रचार
जोडी सुविचार
प्रेमे जोडाक्षर
बांधी सुविचार

तेज सौदामिनी
स्वर्णरत्नाकारी
मराठी हृदयी
साम्राज्य साजिरी

स्वप्नगन्धा सतीश
आम्बेतकर
आर्टिस्ट

नवरात्र..

नवानां चं रात्रिणां
समाहार रे नव रंग
आनंदी स्नेहसंबंध
नित्य रहावे अभंग

नवरात्र उत्साहाची
पुरुष नारी एक रंग
दांडिया गर्बा रंगला
व्यायाम हे एकसंघ

उपावास करु यंदा
नियंत्रणी बांधी चंग
सणाचेसत्व कळता
महत्व वाढले उत्तुंग

प्रवचन विवेचनातून
व्यक्त अद्भुतव्यासंग
भजन गायन किर्तन
घडे आयता सत्संग

आई राधा उदो उदो
भारावले गा अंतरंग
मालिन्यधुवून स्वच्छ
सुखदायक भक्तिरंग

सणशिरोमणी दसरा
सरले मिलनी वादंग
मने बनली सोन्याची
वाजे ताशेसनईमृदंग

दिवाळी दिसे समोर
उत्सुक स्नानाअभ्यंग
उत्सवप्रिय माणसास
स्वागता सज्ज उजंग

गोंधळ ..

सेवातव करु कशी
उडे माझी तारांबळ
अशक्त अशुध्द मन
दुर्गामाते होअरंबळ

न जमली सप्तशती
मी असा मुखदुर्बळ
जमले ना जागरण
घातला कुठे गोंधळ

जोगवा सत्व नकळे
सुटे अश्रध्दा वादळ
कुविचारभ्रष्टावलेले
षड्रीपु करती वर्दळ

उपवासकधीन करे
हवा प्रसाद स फळ
भले भल्या साधका
प्रयासजाई निष्फळ

बदलली जीवनदृष्टी
पाहे तव मुखकमळ
भक्ती मोहात पडलो
कळे श्रध्दा तळमळ

दावे दिव्यत्व प्रचिती
तव अक्षाचे काजळ
आयुष्य भविष्यासह
क्षणार्धा केले उजळ

शोधे तुज दूर दूरवर
असूनि हृदयाजवळ
मी तर साधा मानव
दानवा येईलंभोवळ

- हेमंत मुसरीफ पुणे.
9730306996.

घटस्थापना

घटस्थापनेने असते
नवरात्रोत्सवाची सुरुवात
घटाची स्थापना असते
सर्वत्र घरां-घरात
घटस्थापनेने कुटुंबाची
जोपासल्या जाते संस्कृती
मनां-मनांतील लोप पावते
दुष्ट प्रवृत्ती आणि विकृती
घटस्थापना काळात
सर्व देवींची उपासना
सुख,समृद्धी नांदावी
परिवाराची प्रार्थना
भारतीय संस्कृतीचे प्रतीक
घटस्थापना घरोघरी असे
सर्वत्र देवी-दिकांची
आराधना होताना दिसे
भूतलावरील दुष्ट प्रवृत्तीशी
देवींचा होता मोठा लढा
लढून सोडविला त्यांनी
देव व माणसांचा तिढा
घरोघरी आपण सर्व
घटस्थापना करू या
नवरात्र उत्सव आपण
साजरा करू या-------

धोंडीरामसिंह ध राजपूत,
वैजापूर, संभाजीनगर.
मो.९४२१३१२२४४.

नवरात्र उत्सव

अश्विन शुद्ध प्रतिपदेला
घरोघरी घटस्थापना
पूजा अर्चा करूनी
करू दुर्गामातेची आराधना

नऊ दिवस नैवेद्य
देवीला करू अर्पण
नऊ दिवस नऊ रंगाचे
अंगी वस्त्रे परिधान

नऊ रात्री चाले
दांडीया गरबा खेळ
नाचू गाऊ तालात
बसवूनी मेळ

गोंधळ मांडू देवीचा
उदो उदो गजर भक्तीचा
भक्तास आशिष दे माते
महिमा तुझ्या आदी शक्तींचा

दुर्गामातेच्या सभोवताल
धूप अगरबत्तीचा दरवळ
भक्तीमय वातावरणात
फुलांचा पसरे परिमळ

सदैव तुझी कृपादृष्टी
राहू दे भोळ्या भक्तावर
नऊ रूपे प्रकट करूनी
दुषप्रवृतीचा कर संहार

- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

नवरात्री

उत्सव नवरात्रीचा
दुर्मिळ सोहळा आला
महाशक्ती साऱ्या येता
उद्धार जगाचा झाला

नऊ दिवस देवीचे,
ऊर्जा नवीन मिळते
भक्तीने जाप करता
दुःख हे हरून जाते

महत्व ह्या दिवसांचे
अलौकिक ह्या काळात
दुर्गा शक्ती कार्य करी
सूक्ष्म स्वरूप जगात

स्थिर मन ज्या व्यक्तीचे
पाठ नित्य ते वाचावे
संकल्पाने पूर्ण होता
मार्ग यशाचे साधावे

नवरात्रीच्या रात्रीत
संत साधना सांगती
ह्या पिढीने शिकावे हे
मार्ग सार्थक करती

- तुषार राजेश लाखे.
- वरोरा, जिल्हा चंद्रपूर.

नवदुर्गा पुजन

देतो तुला धन्यवाद अंबे
देतो तुला धन्यवाद.
भक्त घालिती साद,तुजला
भक्त घालिती साद.

नयन पाहती तुझीच मूर्ती,
पूर्ण जगात तुझीच किर्ती.
घेऊनी निरांजन पाच वाती,
भक्त करीती तुझी आरती.

आरती माय रेणूकेची,
आरती आपुल्या जगदंबेची.
आरती अंबाबाईची,
आरती महालक्ष्मीची.

वणी गडावर सप्तश्रृंगी माता,
जगत जननी जगन्माता.
सर्व विकार नष्ट होती,
शक्तीपिठांचे दर्शन घेता.

नवरात्रात शक्ती उपासना,
सद्गुणांची भक्ती जोपासना.
भगवंत प्रिय भक्तांना,
भक्त प्रिय भगवंतांना.

शैलपुत्री प्रथम दुर्गा,
ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा,
कुष्मांडा, स्कंदमाता, कात्यायनी,
महागौरी, सिद्धिदात्री.
नवदुर्गा पुजन करा नवरात्री.

अलकानंतसुत श्रीपाद दसरे.
छ.संभाजीनगर
मो.9975950801

सुख, शान्ति एवम समृध्दि की
मंगलमय कामनाओं के साथ
सभी भक्तों को
नवरात्रि की हार्दिक शुभकामनाएं !

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

दांडिया महोत्सवातुन जमणारा संपूर्ण निधी दुष्काळग्रस्त बळीराजास देणार – विलास कोरडे

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – महाराष्ट्र पर्यटन विभाग व कुलस्वामिनी प्रतिष्ठान तर्फे छत्रपती संभाजीनगरात प्रथमच सामाजिक बांधिलकी जपणारा 'कुलस्वामिनी दांडिया'!

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, कुलस्वामिनी कृषी पर्यटन केंद्र आणि कुलस्वामिनी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने या वर्षी नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून शहरात प्रथमच नवरात्री निमित्त 'कुलस्वामिनी दांडिया' या भव्य सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा उत्सव ११ ऑक्टोबर ते १९ ऑक्टोबर या कालावधीत एन-६, सिडको येथील कुलस्वामिनी मंगल कार्यालयाच्या लॉन वर आयोजित आहे.

पर्यटन आणि संस्कृतीचा अनोखा संगम लॉनवर आयोजित या दांडिया महोत्सवात संभाजीनगर जिल्ह्यातील पर्यटन स्थळांना चालना देण्यासाठी विशेष उपक्रम राबवला जाणार आहे. यात वेरूळ, अजिंठा, घृष्णेश्वर मंदिर, बीबी का मकबरा यांसारख्या प्रसिद्ध ऐतिहासिक व पर्यटन स्थळांची माहिती देणारे आकर्षक फोटो फलक (माहिती फलक) लावले जातील. या कार्यक्रमास परदेशी पर्यटक देखील विशेष उपस्थिती लावणार असल्याने शहराच्या पर्यटनाला आंतरराष्ट्रीय स्तरावर वाव मिळणार आहे. तसेच उपस्थितांसाठी विविध चवदार खाद्यपदार्थांचे स्टॉल्स उपलब्ध असणार आहेत.

एन्ट्री पासच्या माध्यमातून दुष्काळग्रस्तांना मदतीचा हात सदर उपक्रमाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे यात जपणारी सामाजिक बांधिलकी! दांडियासाठी पहिले दोन दिवस ११ व १२ ऑक्टोबर महिला व मुलीसाठी मोफत प्रवेश असणार आहे.

यानंतर दिनांक १३ ऑक्टोबर पासुन महिला व मुलींसाठी रु. १०० आणि जोडप्यांसाठी (कपल) रु. २०० असा नाममात्र एन्ट्री पास (दुष्काळ निधी) ठेवण्यात आला आहे. या माध्यमातून जमा होणारी संपूर्ण रक्कम दुष्काळग्रस्त भागातील तब्बल १०० शेतकरी बांधवांपर्यंत थेट पोहोचवली जाणार आहे.आयोजकांतर्फे प्रत्यक्ष शेतात जाऊन या बळीराजाला किराणा किट व मिठाईचे वाटप करून ऐन सणात मदतीचा हात दिला जाईल.

नगरवासीयांना उपस्थित राहण्याचे आवाहन पर्यटनाला चालना देणाऱ्या आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहणाऱ्या या सामाजिक-सांस्कृतिक उपक्रमात छत्रपती संभाजीनगरच्या नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक श्री. विलास कोरडे (अध्यक्ष, कुलस्वामिनी प्रतिष्ठान) व सौ. अलका कोरडे व प्रोजेक्ट डायरेक्टर अविराज कोरडे यांनी केले आहे.

पाळधीच्या दोन कबड्डीपटूंची जिल्हा संघात निवड

ज्योतिर्मय साहित्य



पहूर ता. जामनेर (गोकुळसिंग राजपूत) : महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या वतीने कुमारी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा दि. ८ ते ११ ऑक्टोबर २०२६ दरम्यान पालघर येथे होणार आहे.

या स्पर्धेसाठी जळगाव जिल्हा कबड्डी संघाची निवड करण्यात आली असून, पाळधी येथील जय श्री राम कबड्डी संघाच्या दोन महिला खेळाडूंची १९ वर्षे वयोगटात जळगाव जिल्हा संघात निवड झाली आहे.

यामध्ये कु. हर्षदा सुभाष माळी आणि कु. गायत्री कडुबा माळी यांचा समावेश आहे. दोन्ही खेळाडूंनी आपल्या मेहनत, जिद्द आणि उत्कृष्ट खेळाच्या जोरावर ही निवड मिळवली आहे.

या निवडीबद्दल दोन्ही खेळाडूंचे पालक, प्रशिक्षक तसेच जय श्री राम कबड्डी संघ पाळधीच्या वतीने अभिनंदन करण्यात येत असून, पालघर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धे साठी त्यांना शुभेच्छा देण्यात येत आहेत.

पाळधीच्या शिरपेचात मानाचा तुरा; दोन खेळाडूंची जिल्हा संघात निवड.

हर्षदा माळी व गायत्री माळी दोघांचा संघर्षमय प्रवास प्रेरणादायी तसेच ग्रामीण परिसरातील मर्यादित साधनसुविधांमध्ये सातत्याने सराव करत आपल्या खेळ कौशल्याला धार दिली त्यांच्या परिश्रमाला जय श्रीराम कबड्डी संघातील प्रशिक्षक म्हणून जामनेर महाराष्ट्र पोलीस दलात कार्यरत असलेले उज्वल जाधव यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले.

मंत्र पुष्पांजली : राष्ट्र कल्याणाची प्रार्थना

ज्योतिर्मय साहित्य

आरती नंतर म्हटली जाणारी ''मंत्र पुष्पांजली'' आपण सारेच म्हणत असतो, परंतु त्याचा व्यापक अर्थ आपल्याला माहित आहे का? जाणून घ्या माहिती

हिंदूंच्या कोणत्याही धार्मिक कार्यक्रमात किंवा आरतीच्या वेळी 'मंत्र पुष्पांजली' म्हटली जाते. परंतु संस्कृत मधील ह्या प्रार्थनेचा किती व्यापक अर्थ आहे हे क्वचितच लोकांना माहित असते. प्रार्थना करणारा व्यक्ती केवळ स्वतःच्या मांगल्याची प्रार्थना करत नाही, तर स्वतः सोबत आपला समाज, राष्ट्र आणि जगाच्या कल्याणाची प्रार्थना यामधून केली जाते. म्हणूनच सनातन धर्म किंवा भारत विश्व कल्याणाचा विचार करणारा धर्म आहे अशी आपली ओळख आहे.

मंत्र पुष्पांजली मधील श्लोकांचा व्यापक अर्थ समजून घेऊ:

१. ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् । ते ह नाकं महिमानः सचन्त यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवाः ।।

अर्थ : देवतांनी यज्ञाच्या माध्यमातून यज्ञाचीच उपासना केली आणि त्यातून धर्माची मूलभूत तत्त्वे प्रस्थापित झाली. त्या धर्ममार्गाने महान व्यक्तींनी उच्च, दिव्य स्थान प्राप्त केले. येथे ''यज्ञ'' म्हणजे केवळ अग्नीत आहुती देण्याचा विधी नव्हे. स्वतःपेक्षा व्यापक समाज, राष्ट्र, विश्व आणि परमसत्यासाठी निः स्वार्थपणे केलेले समर्पण हाही यज्ञाचा व्यापक अर्थ आहे. म्हणजेच समर्पणातून धर्म निर्माण होतो आणि धर्मातून समाजाची व्यवस्था व कल्याण साधले जाते.

२. ॐ राजाधिराजाय प्रसह्यसाहिने नमो वयं वैश्रवणाय कुर्महे । स मे कामान् कामकामाय मह्यं कामेश्वरो वैश्रवणो ददातु । कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः ।।

अर्थ : राजांचा राजा, सामर्थ्यवान वैश्रवण अर्थात कुबेर यांना आम्ही नमस्कार करतो. आमच्या योग्य आणि मंगल इच्छा पूर्ण होण्यासाठी ते आम्हाला सामर्थ्य व समृद्धी प्रदान करो. येथे ''कुबेर'' म्हणजे फक्त पैसा नव्हे. समृद्धीमध्ये धनाबरोबरच साधनसंपत्ती, सुरक्षितता, स्थैर्य आणि समाजाच्या विकासासाठी आवश्यक संपन्नता यांचा विचार आहे.

३. ॐ स्वस्ति । साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं महाराज्यमाधिपत्यमयं समन्तपर्यायी स्यात...

हा भाग प्राचीन वैदिक राजकीय-सामाजिक व्यवस्थांशी संबंधित आहे. समाजात कल्याण, सुशासन, स्वराज्य, समृद्धी आणि व्यापक व्यवस्था प्रस्थापित होवो. पृथ्वीच्या विस्तीर्ण प्रदेशात सुव्यवस्था आणि कल्याण नांदो. यातील ''स्वाराज्य'' हा शब्द विशेष महत्त्वाचा आहे. त्याचा एक अर्थ स्वतःचे शासन असा असला तरी व्यापक तात्त्विक अर्थ स्वसंयम आणि आत्मनियंत्रण असाही घेतला जातो. म्हणजेच चांगले राज्य निर्माण होण्यासाठी केवळ बाह्य सत्ता पुरेशी नाही; व्यक्ती आणि समाजाची अंतर्गत शिस्तही आवश्यक आहे असा त्याचा अर्थ आहे.

४. ॐ तद् ब्रह्म । ॐ तद् वायुः । ॐ तद् आत्मा । ॐ तत् सत्यम् । ॐ तत् सर्वम् । ॐ तत् पुरुषो नमः ।।

अर्थ :तेच ब्रह्म आहे. तेच वायू आहे. तेच आत्मतत्त्व आहे. तेच सत्य आहे. तेच सर्वत्र व्यापून राहिलेले आहे. त्या परमपुरुषाला नमस्कार. हा मंत्र अद्वैतात्मक आणि उपनिषदपर तत्त्वज्ञानाची आठवण करून देतो. सृष्टीतील विविध रूपे वेगवेगळी दिसत असली तरी त्यांच्या मुळाशी असलेले एक परम तत्त्व समान आहे, असा यातील भाव आहे.

५. ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।।

शेवटी तीन वेळा शांती म्हटली जाते. परंपरेनुसार या तीन शांतींचा संबंध तीन प्रकारच्या अडथळ्यांशी जोडला जातो:

आधिदैविक निसर्ग किंवा दैवी शक्तींशी संबंधित अडथळे

आधिभौतिक इतर जीव-जगत किंवा बाह्य परिस्थितींमुळे निर्माण होणारे अडथळे आध्यात्मिक / आध्यात्मिक स्वतःच्या शरीर, मन किंवा अंतर्मनाशी संबंधित अडथळे

म्हणून तीन वेळा ''शांती'' उच्चारून सर्व स्तरांवर शांतता आणि कल्याणाची प्रार्थना केली जाते.

अशी हा विश्व कल्याणाचा, वैश्विक सत्याची प्रार्थना करणारी प्रार्थना आपण आपल्या नित्य पूजा आणि धार्मिक कार्यात करतो याचा आपल्याला अभिमान वाटला पाहिजे.

जयोस्तु भारत, सनातन धर्म:

महानायकाचा वाढदिवस

ज्योतिर्मय साहित्य

आज ११ ऑक्टोबर हिंदी चित्रपटसृष्टीचा शहेनशहा, महानायक अमिताभ बच्चन यांचा वाढदिवस. ११ ऑक्टोबर १९४२ रोजी उत्तरप्रदेशातील अलाहाबाद येथे जन्मलेल्या अमिताभ यांच्या वडिलांचे (हरिवंशराय बच्चन) मूळ आडनाव श्रीवास्तव असले तरी ते बच्चन या टोपणनावाने कविता प्रसिद्ध करीत त्यामुळे अमिताभ यांनीही चित्रपट सृष्टीत आल्यावर बच्चन हेच टोपणनाव आडनाव म्हणून वापरण्यास सुरवात केली. पुढे संपूर्ण कुटुंबाचेच बच्चन हेच आडनाव व्यवहारात रूढ झाले. अमिताभ बच्चन यांचे शालेय शिक्षण अलाहाबाद येथील ज्ञानप्रबोधिनी आणि बॉईज हायस्कूल येथे झाले. दिल्लीच्या किरोडीमल महाविद्यालयातून त्यांनी विज्ञानाची पदवी घेतली त्यानंतर काहीकाळ त्यांनी कोलकाता येथे एका कंपनीत काम केले पण तिथे त्यांचे मन रमले नाही तेथून ते मुंबईत आले आणि चित्रपटात कामाच्या संधी शोधू लागले. अमिताभ बच्चन यांना ख्वाजा अहमद अब्बास यांच्या सात हिंदुस्थानी या चित्रपटात संधी मिळाली. दुर्दैवाने हा चित्रपट चालला नाही. अमिताभ यांचाही म्हणावा तसा प्रभाव पडला नाही. अमिताभ बच्चन यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत पदार्पण केले तेंव्हा देव आनंद, शम्मी कपूर, राजेश खन्ना, विनोद खन्ना, जितेंद्र, धर्मेंद्र, शशी कपूर अशा देखण्या नायकाची चलती होती. अशा काळात अमिताभ तग धरतील का ? अशी साशंकता होती त्यात त्यांच्या पहिलाच चित्रपट जोरदार आपटला मात्र त्यांनी हार मानली नाही. सलग सात चित्रपट आपटूनही ते डगमगले नाही. १९७३ साली आलेल्या प्रकाश मेहरा दिग्दर्शित जंजीर या चित्रपटाने अमिताभ यांना खरा ब्रेक मिळवून दिला. या चित्रपटातील पोलीस इन्स्पेक्टरची त्यांची भूमिका खूप गाजली. या चित्रपटानंतर त्यांची अँग्री यंग मॅन अशी जनमानसात प्रतिमा निर्माण झाली. प्रचलित समाजव्यवस्थेच्या विरोधात बंडखोरी व क्रोध व्यक्त करणाऱ्या युवकांचे प्रतिनिधित्व त्यांनी पडद्यावर साकारले त्यामुळेच त्यांच्या भूमिका प्रेक्षकांना आपल्याशा वाटल्या. उंच शरीरयष्टी, भेदक डोळे, भारदस्त आवाज आणि अनोखी अभिनय शैली यामुळे त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. ते लवकरच सुपरस्टार पदावर पोहचले. दिग्दर्शक ऋषिकेश मुखर्जी यांच्या आनंद चित्रपटात त्यांना सुपरस्टार राजेश खन्ना यांच्यासमवेत काम करण्याची संधी मिळाली. या संधीचे त्यांनी सोने केले. त्यावर्षीचा सर्वो त्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचा फिल्मफेअर पुरस्कार त्यांना मिळाला. नमक हराम या चित्रपटातील त्यांची भूमिकाही लक्षवेधी ठरली. ७० आणि ८० चे दशक अमिताभ बच्चन

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५



यांनी अक्षरशः गाजवून सोडले. दिवार, शोले, अभिमान, कभी कभी, अमर अकबर अँथनी , मुक्कदर का सिकंदर, त्रिशूल, डॉन, काला पथर, नशीब, लावरीस, सिलसिला, नमक हलाल, कुली, शराबी, खुद्दार, अग्निपथ असे एकापेक्षा एक सुपरहिट चित्रपट त्यांनी दिले. अमिताभ बच्चन यांच्या इतकी लोकप्रियता आजतागायत कोणत्याही अभिनेत्याला लाभलेली नाही. अमिताभ बच्चन हे त्यांच्या काळातील सर्वाधिक मानधन घेणारे अभिनेते होते.

त्यांनी आजवर २०० हुन अधिक चित्रपटात भूमिका केल्या. त्यांनी काही चित्रपटात पार्श्वगायनही केले. मिस्टर नटवरलाल चित्रपटातील पार्श्वगायनासाठी त्यांना फिल्मफेअरचा पुरस्कारही मिळाला होता. १९८४ साली त्यांनी राजकारणात प्रवेश केला मात्र हा आपला प्रांत नाही हे लक्षात येताच त्यांनी राजकारणाला रामराम केला. १९८२ साली कुली चित्रपटाच्या शूटिंगच्या वेळी अपघात होऊनही करोडो चाहत्यांच्या आशीर्वादाने अमिताभ पुन्हा एकदा उभे राहिले. १९९६ साली अमिताभ बच्चन कॉर्पोरेशन लिमिटेड ही कंपनी त्यांनी स्थापन केली. मात्र लवकरच त्यांना ती बंद करावी लागली या दरम्यान त्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले. हे आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी त्यांनी दूरचित्रवाणीवरील कौन बनेगा करोडपती या मालिकेचे सूत्रसंचालन करण्यास सुरुवात केली. कौन बनेगा करोडपती ही प्रश्नमंजुषा देखील त्यानी यशस्वी केली. आज ते वयाची ८४ वर्ष पूर्ण करत असले तरी तरुणांना लाजवेल असा त्यांचा उत्साह आहे. अमिताभ बच्चन यांच्यासारखा प्रतिभावान कलाकार युगातून एकदाच जन्माला येतो. त्यांच्यासारखा अभिनेता भारतातच नव्हे तर जगात झाला नाही आणि पुढे देखील होणार नाही. अमिताभ बच्चन यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देतानाच त्यांना दीर्घायुष्य लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करतो. अमिताभ बच्चन यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

कलात्मक दिग्दर्शक गुरुदत्त

ज्योतिर्मय साहित्य

अगदी थोड्या काळात ज्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटून हिंदी चित्रपट सृष्टीत आपले नाव अजरामर केले त्या हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते गुरुदत्त यांची आज पुण्यतिथी. गुरुदत्तजींच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या आठवणींना उजाळा देणारा हा विशेष लेख.

गुरुदत्त हिंदी चित्रपट सृष्टीत जिवंतपणीच अख्यायिका बनलेले व्यक्तिमत्व. आजही गुरुदत्त यांचे नाव घेतले की आठवतात ते त्यांचे कलात्मक चित्रपट मग ते चौदहवी का चांद असोत की कागज के फूल, सी आय डी असोत की मी. अँड मिसेस ५५ आरपार असोत की प्यासा. त्यांच्या प्रत्येक चित्रपटात आणि चित्रपटातील प्रत्येक दृश्यात कलात्मकता दिसून येते. चित्रपट कलात्मक असूनही त्यांच्या चित्रपटांना प्रेक्षकांची पहिली पसंती मिळत असे म्हणूनच त्यांना कलात्मकता आणि व्यावसायिकता यांच्यात सुवर्णमध्य साधणारा संवेदनशील निर्माता दिग्दर्शक म्हंटले जाते. वर उल्लेख केलेले सर्व चित्रपट हिंदी चित्रपट सृष्टीतील माईल स्टोन चित्रपट आहेत. आजही फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट मध्ये शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना हे चित्रपट आवर्जून दाखवले जातात. त्यांच्या प्रत्येक चित्रपटाला समीक्षकांची तर पसंती मिळालीच पण प्रेक्षकांनी ही चित्रपट डोक्यावर घेतले. साहिब बिबी और गुलाम या चित्रपटाला तर राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. आजही ती तितकीच लोकप्रिय आहेत मग ती बाजी चित्रपटातील आज की रात पिया दिल ना तोडो... जाल मधील ये रात ये चांदणी फिर कहा.... आरपार मधील बाबूजी धीरे चलना..... सी आय डी मधील तर सर्वच गाणी लोकप्रिय झालीत मग ती आँखो ही आँखो मे इशारा हो गया... लेके पहला पहला प्यार... ये दिल है मुश्कील जिना यहा... मी अँड मिसेस ५५ मधील थंडी हवाये काली घटाये.... प्यासा मधील जाने वो कैसे लोग थे... कागज के फूल मधील वक्त ने किया क्या हसी सितम... चौदहवी का चांद मधील चौदहवी का चांद हो या आफताब हो.. साहिब बिबी और गुलाम मधील ना जाओ सय्या छुडाके बैया..... त्यांच्या चित्रपटातील सर्व गाणी सुमधुर होती म्हणूनच ती गाणी लोकप्रिय ठरली. केवळ गाणीच नाही तर त्यांच्या चित्रपटातील संवादही लोकप्रिय झाले. गुरुदत्त यांच्यावर बंगाली साहित्य आणि विचारांचा मोठा प्रभाव होता हाच प्रभाव त्यांच्या चित्रपटातूनही दिसून येतो.

९ जुलै १९२५ रोजी बंगलोर येथे त्यांचा जन्म झाला त्यांचे खरे नाव वसंत शिवकुमार पदुकोण असे होते. जन्म जरी बंगलोर येथे झाला तरी त्यांचे बालपण पश्चिम बंगालमधील भवानीपूर येथे गेले. आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने त्यांनी मॅट्रिक पर्यंतच शिक्षण घेतले. नंतर ते पुण्यात आले. तिथे प्रसिद्ध फिल्म कंपनी प्रभात मध्ये त्यांना असिस्टंट दिग्दर्शक व नृत्य दिग्दर्शक म्हणून नोकरी मिळाली. तिथेच त्यांची ओळख देव आनंद यांच्यासोबत झाली ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले आणि पुढे ही मैत्री इतकी घट्ट झाली की दोघांनीही एकमेकांना आपल्या चित्रपटात संधी दिली. देव आनंद यांच्या बाजी आणि जाल या चित्रपटाचे दिग्दर्शन गुरुदत्त यांनी केले तर गुरुदत्त यांनी निर्माण केलेल्या सी आय डी या चित्रपटात देव आनंद हे नायक होते .

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

गुरुदत्त हे एक महान चित्रपट कर्मी होते त्यासोबतच ते एक माणूस ही होते. इतर माणसांप्रमाणे त्यांच्यातही गुणदोष होते. बाजी या चित्रपटाच्या सेटवर गुरुदत्त यांची गीता रॉय या बंगाली अभिनेत्रीशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला. त्यांना तीन मुलेही झाली पण दोघांचे एकमेकांशी पटले नाही दोघात किरकोळ कारणांमुळे वाद होऊ लागला. दररोज होणारा वाद टाळण्यासाठी गीता रॉय मुलांना घेऊन घराबाहेर पडल्या, वेगळ्या राहू लागल्या याच दरम्यान गुरुदत्त हे वहिदा रहेमान यांच्या जवळ गेल्याचे बोलले गेले मात्र वहिदाजींना आपले करियर करायचे असल्याने त्या या नात्यात अडकल्या नाहीत. या सर्व कारणांनी गुरुदत्त कमालीच्या डिप्रेशनमध्ये गेले आणि तो काळा दिवस उजाडला. ९ ऑक्टोबर १९६४ रोजी पत्नी गीता रॉय मुलांसह त्यांना भेटायला येणार होत्या मात्र त्या आल्या नाहीत त्यामुळे चिडलेल्या गुरुदत्त यांनी रागाचा भरात झोपेच्या गोळ्या खाल्ल्या. त्यांना हॉस्पिटलमध्ये ऍडमिट करण्यात आले पण दुसऱ्याच दिवशी म्हणजे १० ऑक्टोबर १९६४ रोजी त्यांची प्राणज्योत माळवली.

अवघ्या ३९ वर्षाचे आयुष्य त्यांना लाभले. त्यांच्या निधनानंतर प्रख्यात शायर कैफी आझमी यांनी लिहिलंय

रहनेको सदा दहरमे आता नही कोई
तुम जैसे गये वैसे जाता नहीं कोई
एक बार तो मौत भी घबरा गई होगी
यू मौत को सिने से लगाता नहीं कोई

ॐ तत् सत् कृष्णार्पण....

ज्योतिर्मय साहित्य

ॐ तत् सत्

हे परब्रम्हाचे नाव आपल्याला माहित आहे .

हे नाव घेऊन सात्विक कर्मे केली तर मोक्षापर्यन्त नेण्याचे सामर्थ्य या शब्दात आहे आणि सत्कर्म करण्यास आणून ठेवण्याची शक्ति

ॐ तत् सत् या नावात आहे.

मित्रांनो आपण आता पर्यन्त जेव्हा जेव्हा संतसाहित्याचा अभ्यास केला तेव्हा तेव्हा परब्रह्माला अनादि, निर्गुण ,निराकार स्वरूपात पहात आलो.

मग त्याला नाव कसे ?
साधाभोळा प्रश्नच ना !!!
पण श्रृतिमाऊलीला,
संसार तापाने पीडलेल्या तुमच्या माझ्यासारख्या लोकांची दया आली व या दुःखातून सोडवून ब्रम्हप्राप्ति करून देण्यासाठी हे नाव तिने ब्रम्हाला ठेवले.

जो ब्रम्ह की ज्याच्या पाशी सृष्टि निर्माण करण्याची शक्ति या नामाच्या आवर्तनाने आली

सात्विक कर्म या ब्रम्हनामाने युक्त होऊन आचरले तर मोक्ष नावाचा चाकर आपण होऊन आनंदाने त्याच्या पुढ्यात उभा रहातो*.

नाम घेताना सात्विकतेचा प्रसाद आपल्या अंतरंगात असला पाहिजे.

काया वाचा मन बुद्धी सात्विक असली पाहिजे

नाही तर आजकालच्या धकाधकीच्या जीवनात आपण जे अन्न खातो ते सर्व भेसळयुक्त तर आहेच

पण त्यातल्या त्यात घरी बनवलेले अन्न खाऊन आपल्या वृत्तीत सात्विक भाव मिळेल अशी आशा करूया.

कर्माच्या आरंभी ध्यानाने

ऊँकाराचा अर्थ वृत्तीवर आरूढ करून मग त्या वाटेने जाताना

(ऊँ असा) स्पष्ट उच्चार करून घ्यायला हवा.

ऊँकाराने आपल्या शरिराच्यच्या सर्व नसानसात विधियुक्त क्रियांना आपल्यातल्या सर्व क्रिया (आचारधर्म,विचार शलाका,अन्नपाणी ,

समाजाप्रती आदर सर्वत्र स्नेहभाव वाढीस लागतो.)



आणि मग

सगळं जग *विष्णूमय वाटतं

अशा रसदार फळाने बहरलेलं मन आपल्याचं विचारांची उंची वाढवते

मन सांगते

तत् शब्दाचा विनियोग करावा.

म्हणजे तत् शब्दाने जें ब्रम्ह त्या ब्रम्हाला ते कर्म व फळ ही दोन्ही आपल्या ठिकाणी भोगायला काही शिल्लक न ठेवता अर्पण करावीत.

आता कर्म ब्रह्मरूप होते

पण कर्म ब्रह्मरूप झाले तरी तेवढ्याने समाधान होत नाही.

कारण ब्रम्हार्पण करणारा अजूनही अहंकारी असतो.

कर्ता जोपर्यंत वेगळा होत नाही मोह पाशातून दूर जात नाही,

तोपर्यंत त्याची संसारातून सुटका नाही

म्हणून कर्ता ब्रम्हरूप होण्यासाठी सत् शब्दांचा विनियोग कर्माच्या शेवटी आहे.

जेवढे म्हणून आकाराला आले आहे ते मिथ्या असून एक ब्रम्ह निर्दो ष आहे असे तत् शब्द सांगतो.

ब्रह्मरूप झालेल्या कर्माचे या सत् शब्दांशी एकरूप झाले म्हणजे शिल्लकच काही रहात नाही.

आपल्यासह सर्व ब्रम्हचं आहे असा अद्वैत अनुभव

त्याला येतो.

जसे ज्ञानेश्वर, तुकाराम महाराजांच्या सह सर्व थोर संत मंडळी ब्रम्हस्वरूपात एकरूप होऊन गेले

तत् शब्दाचा आणखी एक मोठा अर्थ आहे

की कर्म करणारा संसारी माणूस असतो. त्याने कर्म करताना कितीही शिकस्त केली तरी काहीतरी न्यूनता ही रहातेचं ना!!

कर्म करताना कमतरता न्यूनता रहाणे व शास्त्र धर्माचे क्वचितच उल्लंघन होणे हे संभवनीय आहे.

आपल्या सत् पणाच्या सामर्थ्याने कर्मातील हा न्यूनत्वाचा व असत् पणाचा दोष घालवून त्याला पूर्ण सत् कर्माच्या योग्यतेला हा सत् शब्द असतो.

अशाप्रकारे आपल्या जन्म मरणाच्या संसारात बांधणारा सर्व कर्मांचा त्यांच्या कर्त्यासह

ब्रम्हापर्यन्त पोहचवण्याचे सामर्थ्य

''ऊँ तत् सत्* *या नामा मध्ये आहे.''

टिप ---माझे आईवडील सासर माहेरचे सर्व पूर्वज, भारतीय सीमेवर बळी पडलेले तिनही दलाचे देश रक्षक, समाजासाठी कार्य करताना बळी पडलेले मी व माझ्या कुटुंबावर अव्याहतपणे प्रेम माया लावणारे की त्यांची हरघडी आठवण येते त्या सर्वांना हा शब्दरूपी तर्पणविधी. ऊँ तत् सत् कृष्णार्पण

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559